सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३६१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## थोडक्यात...

### प्रयागराज हादरलं!

**प्रयागराज :** उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आज म्हणजेच गुरुवार ९ एप्रिल रोजी अतीक अहमदचा ड्रायव्हर मोहम्मद इरफान, याची दिवसाढवळ्या गोळ्या घालून हत्या करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना प्रयागराज मधील केली येथील बिस्मिल्लाह चौकाजवळ घडली. या घटनेने प्रयागराज हादरलं आहे. बिस्मिल्लाह चौकाजवळ इरफान चहा पित असताना हा हल्ला झाला. चेहऱ्यावर रुमाल बांधलेले चार हल्लेखोर दोन मोटरसायकलवरून आले होते. त्यापैकी एकजण खाली उतरला आणि थेट इरफानच्या छातीत गोळी झाडली. गोळीबार होताच परिसरात घबराट पसरली आणि आरोपी घटनास्थळावरून फरार झाले.

### महिला प्रवाशांना दिलासा

**मुंबई :** लोकलमधून प्रवास करणाऱ्या महिलांना आता घाबरण्याची गरज नाही कारण चर्चगेट ते डहाणू दरम्यान लोकलनं प्रवास करणाऱ्या लाखो महिला प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. रेल्वे सुरक्षा दलाने (ठझऋ) महिलांच्या सुरक्षेसाठी 'सखी' हा विशेष व्हॉट्सॲप उपक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून महिला प्रवासी थेट आरपीएफच्या महिला अधिकाऱ्यांशी जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत त्यांना आता अवघ्या काही मिनिटांत मदत मिळणार आहे.

### आठवलेंकडून राज्यपालांची भेट

**मुंबई :** महाराष्ट्राचे राज्यपाल महामहीम जिष्णू देव वर्मा यांची रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी लोकभवन येथे सदिच्छा भेट घेतली.बुद्धमूर्ती आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेट देऊन राज्यपालांचा शाल पुष्पगुच्छ देऊन रामदास आठवले यांनी सत्कार केला. महाराष्ट्रातील धर्मांतरित बौद्धांची जनगणनेत अनुसूचित जातीत नोंद करण्यात यावी. राज्यात ज्यांनी अनुसूचित जातीतून बौद्ध धम्मात धर्मांतर केले आहे अशा नवबौद्ध समाजाची नोंद जनगणनेत अनुसूचित जातीत व्हावी या मागणीच्या अनुषंगाने ही भेट होती.

### मांजरी स्टेशनचा कायापालट

**पुणे :** पुणे रेल्वे विभागाने वाढती प्रवासी गर्दी आणि रेल्वे वाहतुकीवरील ताण लक्षात घेऊन दोन महत्त्वाचे प्रकल्प जाहीर केले आहेत. मांजरी स्थानकाचे उन्नतीकरण आणि रामटेकडी येथे नवीन ब्लॉक स्टेशन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे गाड्यांच्या विलंबाचा प्रश्न कमी होण्याची अपेक्षा आहे.सध्या मांजरी हे केवळ एक हाल्ट स्थानक असून येथे मर्यादित गाड्या थांबतात. मात्र आता त्याचा 'इ' श्रेणीतील स्थानकात समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी अधिक सुविधा आणि सेवा उपलब्ध होणार आहेत.

### कारलाच बनवले घर

**अहमदाबाद :** सध्या देशभरात कार मॉडिफिकेशनचं वारं वाहत असलं तरी गुजरातच्या एका पठ्ठ्याने मात्र कल्पकतेच्या सर्व सीमा ओलांडल्या आहेत. कारला केवळ अलॉय व्हील्स किंवा एलईडी लाईट्स न लावता, त्याने थेट कारची 'चालती-फिरती बेडरुम' तयार केली आहे. या अनोख्या '१इक्ष' कारचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून नेटकरी हे पाहून थक्क झाले आहेत.

### २५ हजार यात्रेकरूंची सोय

**रुद्रप्रयाग :** चारधाम यात्रेपूर्वी केदारनाथमध्ये यावेळी 'नो रूम'ची चिंता संपताना दिसत आहे. प्रशासनाने सुमारे २५ हजार भाविकांच्या रात्रीच्या मुक्कामासाठी मजबूत नियोजन तयार केले आहे. पायवाटेपासून ते धामपर्यंत कॉटेज आणि तंबूंची व्यवस्था केली जात आहे, जेणेकरून भाविकांना रात्रीच्या मुक्कामासाठी भटकावे लागणार नाही.केदारनाथ धामचे दरवाजे उघडायला अवघे १३ दिवस शिल्लक आहेत, त्यामुळे जिल्हा प्रशासन यात्रा व्यवस्थांना अंतिम रूप देण्यात व्यस्त आहे.

# होर्मुज सामुद्रधुनीवर इराणचा मोठा निर्णय; इराणकडून पर्यायी समुद्री मार्ग

**तेहरान/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियात सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आता होर्मुज सामुद्रधुनी संदर्भात एक मोठी घडामोड समोर आली आहे. माहितीनुसार, इराणने जहाजांच्या वाहतुकीसाठी पर्यायी समुद्री मार्गांची घोषणा केली असून, याचा जागतिक व्यापार आणि तेलपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे.



इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) च्या नौदलाने जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, समुद्री सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आला आहे. आयआरजीसी नौदलाने सर्व मालवाहू जहाजे आणि नौकांना नव्याने निश्चित केलेल्या मार्गांचे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. जहाजांची ये-जा आयआरजीसी नौदलाच्या कडक देखरेखीखाली केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

जगातील सुमारे २० टक्के तेल वाहतूक याच सामुद्रधुनीतून होत असल्याने सुरक्षेबाबत चिंता वाढल्या होत्या. दोन आठवड्यांच्या तात्पुरत्या युद्धविरामाचा भाग म्हणून होर्मुज सामुद्रधुनी तात्पुरती पुन्हा खुली करण्यात आली असून, त्याचाच एक भाग म्हणून इराणने हा निर्णय घेतला आहे.

प्रवेश मार्ग : ओमान समुद्रातून होर्मुज सामुद्रधुनीत प्रवेश करणारी जहाजे आता लारक बेटाच्या उत्तरेकडील भागातून प्रवास करतील. त्यानंतर ती पर्शियन आखाताच्या दिशेने पुढे जातील. संभाव्य धोक्यांपासून बचाव करत सुरक्षित प्रवेश मिळावा हा या मार्गाचा उद्देश आहे.

निर्गमन मार्ग : आखातातून बाहेर पडणाऱ्या जहाजांसाठीही नवीन मार्ग निश्चित करण्यात आला आहे. ही जहाजे लारक बेटाच्या दक्षिणेकडील भागातून ओमान समुद्राच्या दिशेने रवाना होतील.

इराणचे म्हणणे आहे की, या नव्या मार्गांचा उद्देश जहाजांना सुरक्षित आणि अखंड प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. जलमार्गात कोणतीही अप्रिय घटना टाळणे आणि आंतरराष्ट्रीय नौवहन सुरळीत ठेवणे, या दिशेने हा एक महत्त्वाचा उपक्रम असल्याचेही इराणने स्पष्ट केले आहे.

## पार्थ पवारांनी घेतली खासदारकीची शपथ

**नवी दिल्ली/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाची घडामोड आज देशाच्या राजधानीत पाहायला मिळाली. दिवंगत अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांनी आज राज्यसभेच्या खासदारकीची अधिकृत शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यावेळी पार्थ पवार यांच्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले, ज्याची चर्चा आता संपूर्ण महाराष्ट्रभर रंगली आहे. पार्थ पवार यांनी संसदेत प्रवेश करताना परिधान केलेले कपडे हे त्यांचे वडील अजित पवार यांची आठवण करून देणारे होते. अजित पवार ज्याप्रमाणे अनेकदा गुलाबी जॅकेट आणि डोळ्यावर चष्मा अशा विशिष्ट शैलीत दिसतात, तसाच हुबेहूब लूक पार्थ पवार यांनी केला होता. त्यांच्या या 'दादा स्टाईल' लूकमुळे सोशल मीडियावर पार्थच्या रूपाने संसदेत दुसरे दादा आलेत, अशा चर्चा सुरू झाल्या आहेत.

## भोंदू खरातविरोधात तक्रारींचा महापूर, लैंगिक शोषणाचे आणखी ११ आरोप

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०८ एप्रिल :** वासनांध अशोक खरात प्रकरण दिवसेंदिवस अधिक गंभीर होत असून, तक्रारींची संख्या सातत्याने वाढताना दिसत आहे. आधीच लैंगिक शोषणाच्या गुन्ह्यांमध्ये अटकेत असलेल्या खरातविरोधात आता आणखी ११ महिलांनी पुढे येत तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा व्याप आणि गंभीरता अधिकच वाढली आहे.

अशोक खरातविरोधात आधीच अनेक गुन्हे दाखल असताना, नव्या ११ महिलांच्या तक्रारींमुळे एकूण तक्रारींचा आकडा २२ वर पोहोचला आहे. यापैकी बहुसंख्य तक्रारी लैंगिक शोषणाशी संबंधित असल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे तपास यंत्रणांसमोर आव्हान अधिक वाढले आहे. तक्रारदार महिलांच्या म्हणण्यानुसार, खरात हा 'ऊर्जादान' आणि 'शरीरशांती'च्या नावाखाली महिलांशी संपर्क साधत असे. विश्वास संपादन केल्यानंतर त्यांना जाळ्यात ओढून त्यांचे शोषण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.















# पैठणच्या डाव्या कालव्याला 700 कोटींचा निधी : मंत्री राधाकृष्ण विखे पाटील



**तभा वृत्तसेवा**

पैठण दि ०८ :- मराठवाड्याची जीवनरेखा असलेल्या नाथसागर जलाशयाच्या डाव्या कालव्याला दुरुस्तीसाठी ७०० कोटींचा निधी देण्यात आला असून येणाऱ्या काळात आणखीन निधी दिला जाईल अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली संत बीड येथे कालवा सल्लागार समितीच्या बैठकीला मंत्री विखे आले होते. सुवर्ण मोहोत्सवी नाथसागर जलाशयाला त्यांनी भेट दिली याप्रसंगी आमदार विलास बापू भुमरे , लाभक्षेत्र विकास मुख्य अभियंता सुनंदा जगताप, मुख्य अभियंता अरुण नाईक,जलसिंचन मुख्य अभियंता राजीव मुंदडा, गोदावरी महामंडळ कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार,जि प सभापती अविनाश गलांडे कार्यकारी अभियंता प्रशांत संत उपकार्यकारी अभियंता श्रद्धा निंबाळकर, अभियंता दीपक डोंगरे, शाखा अभियंता मंगेश शेलार, तुषार विसपूते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना नामदार विखे म्हणाले की नाथसागर धरण उभारणीला राज्याचे भगीरथ स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांचे मोठे योगदान असून संत ज्ञानेश्वर महाराज , संत एकनाथ महाराज यांच्या पुण्य भूमीत अत्यंत कमी काळात जायकवाडी सारखा ११० टीएमसी पाण्याची क्षमता असलेला धरण उभा राहिला यासाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांचे विखे यांनी अभिनंदन करून सत्कार केला.नाथसागर धरणाला मूर्त स्वरूप दिले जाणार असून गोदावरी खोऱ्यातील पाणी धरणात आणण्यात येणार आहे व धरणातील गाळ लवकरच काढण्यात येणार आहे. तसेच उद्योग नगरीला देण्यात येणारे पाणी नियम पाळत असलेल्या उद्योगांना कमी करण्यात येईल असे हे विखे यावेळी म्हणाले याप्रसंगी अभियंता तुषार विसपूते, गणेश खराडकर, नगराध्यक्ष भूषण कावसणकर, पंचायत समिती सभापती वैशाली विनोद बोंबले, उप नगराध्यक्ष तुषार पाटील, नंदलाल काळे, नाथ संस्थान कार्यकारी विश्वस्त दादा बारे, शहादेव लोहारे, स्वीय सहाय्यक सतिष आंधळे, अविनाश धारकर, संदीप मडके सह मान्यवर उपस्थित होते.

### आ. विलास बापू भुमरे यांच्या मागणीला यश

पैठणच्या सार्वजनिक विकासासाठी आमदार विलास बापू भुमरे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निधीची मागणी केली होती यासाठी नाथसागर जलाशयाच्या डावा कालवा दुरुस्तीसाठी ७०० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला पुढच्या टप्प्यात उजवा कालवा दुरुस्तीसाठी निधी मिळणार आहे. पैठण शहराच्या सर्वांगीण विकास होणार म्हणून शहराचा ४०० हेक्टर परिसरात पर्यटन विकास केंद्र निर्माण केले जाणार यामुळे पर्यटनाला चालना मिळून रोजगारात वृद्धी होणार आहे. नाथसागर जलाशयाला चिटकून असलेले नादुरुस्त १२ मेगा वॅटचे हायड्रो प्रकल्प लवकरच सुरू होणार आहे. यासाठी येणाऱ्या आठवड्यात टेंडर काढले जाणार असल्याची माहिती नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

## डॉ. प्रवीण तोगडिया यांचे कन्नडमध्ये जंगी स्वागत; कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**

कन्नड :- दि.०९ एप्रिल - डॉ. प्रवीण तोगडिया यांचे कन्नड शहरात आगमन होताच कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले. दि. ८ रोजी सायंकाळी पिशोर नाका येथे हा स्वागत सोहळा पार पडला. आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात घोषणाबाजी करत त्यांचे स्वागत केले.

या वेळी देवगिरी प्रांत अध्यक्ष राष्ट्रीय बजरंग दल सुभाष मोकडीया यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. तसेच शेखर ढोरे, सचिन राठोड, रमेश रेंगे, अमित लोंखडे, संकेत मेठी, चंदा राजपूत, दिनेश जहागीर, प्रवीण वाघमारे, विजय वाणी, मयूर राठोड, शशिन जाधव, प्रवीण अहिरे, क्षितिज पवार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. तोगडिया यांच्या आगमनाने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यकर्त्यांनी फुलांचा वर्षाव करून व घोषणाबाजी करत त्यांचे स्वागत केले. यावेळी संघटनेच्या कार्याबाबत चर्चा करण्यात आली असून, आगामी काळात संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## क्षेत्र वेरुळ नाथ श्रीआश्रम येथे नवनाथ कथेचे स्वामी अरुणा नाथ गिरीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता



**तभा वृत्तसेवा**

खुलताबाद दि ९ एप्रिल श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम येथे दि २ एप्रिल दि ९ एप्रिल रोजी अरुणा नाथ गिरीजी महाराज अडबंगनाथ संस्थान भामाठाण यांच्या काल्याच्या कीर्तनाने कथेची सांगता झाली. नाथ आश्रम प्रमुख साध्वी अक्का महाराज यांच्या प्रमुख नियोजना खाली हजारो भक्तांच्या उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रम चे उत्साहात सांगता झाली. या कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे महापौर समीर भैय्या राजुरकर शिवसेना नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे घृष्णेश्वर मंदिर ट्रस्ट अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य कुणाल दांडगे माजी सभापती दिनेश अंभोरे फुलंब्री पंचायत समितीचे माजी सभापती विवेक बापू चव्हाण वेरूळ गावचे सरपंच प्रकाश पाटील विकास कुलकर्णी भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे भाजपा तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण विकास कापसे संतोष करपे पाटील भाजपा विकास कापसे संतोष करपे पाटील सतीश लव्हाळे उद्योजक ईसाराम मातकर. बाळू भाऊ घोडके विजय घोडके यांच्यासह हजारो भक्तांच्या उपस्थितीत काल्याच्या प्रसाद ने कार्यक्रमाची सांगता झाली उद्योजक ईसाराम मातकर. बाळू भाऊ घोडके विजय घोडके यांच्यासह हजारो भक्तांच्या उपस्थितीत काल्याच्या प्रसाद ने कार्यक्रमाची सांगता झाली

## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याकडून विभागातील कामकाजाचा आढावा



**छत्रपती संभाजीनगर** | विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विभागातील विविध कामांचा आढावा घेत संबंधित कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस विभागातील सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. तसेच अपर आयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार, अपर आयुक्त (साप्रवि) मंजूषा मिसकर, तहसीलदार (महसूल) अरुण पावडे आणि तहसीलदार (साप्रवि) किसन भदाणे प्रत्यक्ष उपस्थित होते.

बैठकीत निवडणूक विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम, सेवा हक्क दिन, जनगणना, साधना सप्ताह तसेच अपर जिल्हाधिकारी व अपर तहसील कार्यालय निर्मिती आदी विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

राज्यात 28 एप्रिल 2015 पासून लागू असलेल्या लोकसेवा हक्क कायदा अंतर्गत नागरिकांना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देणे अपेक्षित आहे. यानिमित्ताने येत्या 28 एप्रिल रोजी 'सेवा हक्क दिन' प्रभावीपणे साजरा करण्यासाठी शासनाने निश्चित केलेले विविध उपक्रम जिल्हा व ग्रामस्तरावर राबवावेत, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, "एकही पात्र मतदार वंचित राहू नये आणि एकही अपात्र नाव यादीत राहू नये," हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी दुबार नावे, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नोंद वगळून तसेच अपूर्ण अथवा अस्पष्ट छायाचित्रे दुरुस्त करून पात्र नागरिकांची नावे अचूकपणे समाविष्ट करावीत. तसेच सर्व जिल्ह्यांमध्ये मतदारांचे मॅपिंग करून हा कार्यक्रम विहित कालावधीत पूर्ण करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, देशव्यापी जनगणना अचूकपणे पूर्ण करण्यावर भर देत, iGOT Karmayogi या प्लॅटफॉर्मवरील 4 तासांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी 10 एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याने, उर्वरित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ते वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

अपर जिल्हाधिकारी व अपर तहसील कार्यालयांच्या मुख्यालय निर्मितीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांची मते विचारात घेऊन लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबतही कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

## राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि ८ जिमाका- अनुसूचित जातीच्या मुला मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहु महाराज शिष्यवृत्ती योजने अंतर्गत विदयार्थ्यांकडुन अर्ज मागविण्यासाठी शासनाने मंजूरी दिलेली आहे.सन २०२६-२७ या वर्षातील जागा भरणेसाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज व त्याची प्रत मागविण्यात येत आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या https://maharashtra.gov.in/site/viewallnews किंवा https://www.maharashtra.gov.in/site/upload/pdf/fs-adv-2026-27.pdf या संकेतस्थळावर ताज्या घडामोडीमध्ये विस्तृत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १५. मे २०२६ पर्यंत सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत आहे . सदरील योजनेचे अर्ज आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, ०३ चर्च पथ, पुणे-०१ यांचे कार्यालयात सादर करण्याबाबतचे आवाहन . आर.एम. शिंदे ,सहायक आयुक्त, समाज कल्याण, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 18 तास अभ्यास

### तारांगण अभ्यासिकाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

कन्नड :- दि.०९ एप्रिल - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कन्नड येथे १८ तास सलग अभ्यासाचा अनोखा उपक्रम राबविण्यात येणार आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, कन्नड नगरपरिषद तसेच तारांगण अभ्यासिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत हा अभ्यास उपक्रम पार पडणार असून, विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, शिस्त आणि सातत्य निर्माण करण्याचा यामागील उद्देश आहे. "सदैव वाचत रहा, सहभागी व्हा" या संदेशातून विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याचा प्रयत्न आयोजकांकडून करण्यात येत आहे.

या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नाश्ता व जेवणाची सोय जागेवरच करण्यात येणार असून, सर्व सहभागींना प्रमाणपत्र तसेच ग्रंथ भेट देण्यात येणार आहे. हा उपक्रम तारांगण अभ्यासिका, त्रिशरण बुद्ध विहार समोर, हिवरखेडा रोड, कन्नड येथे आयोजित करण्यात येणार आहे.

नोंदणीसाठी दि. १२ एप्रिल २०२६ पर्यंत संपर्क साधणे आवश्यक असून, अधिक माहितीसाठी ९०८०६२९४४ व ८८०६५६०९८७ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शनायाच्या मनपरिवर्तनामुळे भावनिक वळण

सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत आता एक भावनिक वळण पाहायला मिळणार आहे. पुष्पा (करुणा पांडे) तिच्या आयुष्यातील सर्वात कठीण टप्प्याला सामोरी जाते. प्रामाणिकपणा आणि चिकाटी यासाठी ओळखली जाणारी पुष्पा एका अशा वादाच्या केंद्रस्थानी येते ज्यामुळे तिच्या मूल्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. आगामी भागांमध्ये, शनाया बापोदरा चाळीतल्या मुलांना शिकवायला सुरुवात करते. एका छळल्या जाणाऱ्या मुलीला स्वतःसाठी उभं राहण्याचा सल्ला दिल्यामुळे पालकांमध्ये नाराजी निर्माण होते आणि टेरेस बंद केली जाते.

## पैठण तालुक्याचे विविध विकास कामाचा आढावा

# सर्वसामान्यांच्या तक्रारी निवारणाबरोबरच विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा : जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

**छत्रपती संभाजीनगर** | सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी निवारण करण्याबरोबर आवास , शेत रस्ते, कृषी, पाणीपुरवठाया पायाभूत विकास योजनाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी आज येथे दिले

पैठण तहसील कार्यालयामध्ये आढावा तालुकास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम ,उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे, तहसीलदार ज्योती पवार, गटविकास अधिकारी अनुपमा गायकवाड, नगरपालिका मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, पोलीस निरीक्षक विकास पाटील, तालुका कृषी अधिकारी बळीराम राठोड, विस्तार अधिकारी मनोज चव्हाण गटशिक्षण अधिकारी यांच्यासह सर्व तालुकास्तरीय अधिकारी, तलाठी, ग्रामविकास अधिकारी, मंडळ अधिकारी यांची उपस्थिती होती.

आवास योजनेतील घरकुलांसाठी मोफत वाळू वाटप, लोकशाही दिनातील प्रलंबित अर्ज व त्याचा संबंधित विभागाला निकाली काढण्यासाठी पाठपुरावा करावा.मतदार यादी मॅपिंगचे काम , जनगणना कामाच्या संदर्भातील प्रशिक्षण, कृषी लागवडीखालील क्षेत्राच्या सिंचन सुविधा व पीक प्रकार याबाबत आढावा घेण्यात आला.


छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अंतर्गत पानंद रस्ते,. तालुक्यातील दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणी आणि वाटप याबाबतही संबंधितांना सूचना दिल्या.

पानंद रस्त्याचे कामकाज आणि फेरफार नोंदीचे प्रकरण एक महिन्याच्या वर प्रलंबित ठेवू नये, तसेच पीएम किसान ,ई केवायसी आणि ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडीचे काम पूर्ण करण्यासाठी प्राधान्य द्यावे. आवास योजनेतील घरांसाठी मोफत राखीव वाळू उपलब्ध करून देण्या बरोबरच नवीन वाळू घाटा वरील वाळू उपलब्ध करून देण्यात यावी. प्रत्येक अधिकाऱ्याने क्षेत्रभेटी देऊन संबंधित योजनेच्या कामकाजाची वेळोवेळी आढावा घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामविकासाच्या विविध योजनांचा घेतला आढावा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम यांनी ग्राम विकास अंतर्गत असलेल्या विविध विकास कामाच्या अंमलबजावणीचा आढावा त्यांनी घेतला .पायाभूत सेवा पुरवठा करणाऱ्यांमध्ये अंगणवाडी, शाळा आणि आरोग्य उपकेंद्र आणि ग्रामपंचायत कार्यालय हे सुस्थितीत कार्यान्वित असायला पाहिजेत या अनुषंगाने आवश्यक ते कार्यवाही करून स्वच्छ ,सुंदर कार्यालय संकल्पना राबविण्यात यावी. सुसज्ज अंगणवाड्या, आरोग्य केंद्र करावेत ,याबाबत तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देशित केले.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील घरकुलाचे उद्दिष्ट प्राधान्याने पूर्ण करून आवास योजनेच्या लाभार्थ्यांना घर देण्यासाठी योग्य ती कार्यवाही ग्रामविकास अधिकारी ते उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंतच्या सर्व यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी केले. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून स्वच्छ, सुंदर गाव आणि आरोग्य संपन्न गाव बनवण्यासाठी पुढाकार घ्यावा. एक महिन्याच्या आत सर्व ग्रामपंचायत कार्यालय अंगणवाडी, शाळा तसेच जिल्हा परिषद शाळा यामध्ये पायाभूत सेवा सुविधा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक ती साधनसामग्रीची मागणीचे प्रस्ताव सादर करावेत. कार्यालयातील जुन्या कालबाह्य वस्तूचे निर्लेखन करण्याबाबतही संबंधित गटविकास अधिकारी श्रीमती मिन्नू यांनी सुचित केले.

## जनाबाई शेळके यांचे निधन



**बिडकीन दि ९ एप्रिल** | तोंडेळी येथील रहिवासी जनाबाई भानुदास शेळके (८५) यांचे (दि.९) गुरुवार रोजी रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास दुखत निधन झाले. त्यांच्यावर तोंडोळी येथे सायंकाळी पाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या कैलास शेळके यांच्या मातोश्री होत.

## जागतिक ऊर्जा संकटातही पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाकडून एलपीजी

छत्रपती संभाजीनगर - जागतिक ऊर्जा धक्क्यामुळे इंधन उपलब्धतेत अडथळे निर्माण होऊन अनेक प्रदेशांत टंचाई निर्माण झालेली असताना, प्रतिकूल बाह्य परिस्थितीतही भारताने आपल्या घरगुती ग्राहकांना एलपीजीचा सातत्यपूर्ण पुरवठा सुनिश्चित करत व्यापक स्तरावर स्थैर्य राखले आहे.एलपीजीसाठी भारताचा सुमारे ६० टक्के आयातीवर अवलंब आणि जागतिक पुरवठा प्रामुख्याने होर्मूज सामुद्रधुनीमार्गे केंद्रित असल्याच्या पार्श्वभूमीवर, सरकारने पुरवठा सुरक्षित करण्यासाठी तसेच देशांतर्गत उपलब्धता वाढविण्यासाठी तातडीने पावले उचलली आहेत. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय प्रत्येक घरापर्यंत सुरक्षित, परवडणारा आणि अखंड एलपीजी पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध असून, वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता आणि पारदर्शकता अधिक बळकट करण्याचे प्रयत्नही सुरू ठेवत आहे.

## ट्रेनमध्ये जेवण पोहोचवण्याची सुविधा सुरू

मुंबईः : "इक्सिगो ट्रेनस्" आणि कन्फर्मटिकट भारतातील आघाडीचे एआय-आधारित ट्रेन तिकीट प्लॅटफॉर्म, यांनी भारतातील अग्रगण्य ऑन-डिमांड सुविधा प्लॅटफॉर्म असलेल्या "स्विगी (स्विगी लिमिटेड, एनएसई : स्विगी / बीएसई: 544285) सोबत त्यांच्या "फूड ऑन ट्रेन" ' सेवेला चालना देण्यासाठी भागीदारी केली आहे. स्विगी च्या रेस्टॉरंट नेटवर्कला इक्सिगो आणि कन्फर्मटिकट ॲप्समध्ये समाकलित करून, हे सहकार्य प्रवासात असलेल्या प्रवाशांच्या भुकेच्या समस्येवर आवश्यक उपाय प्रदान करते - ग्राहकांना घरबसल्या ऑर्डर करताना स्विगी कडून मिळणाऱ्या निवडी, विश्वासार्हता आणि मूल्याप्रमाणेच.या एकत्रीकरणामुळे, प्रवाशांना शहरांमधील लोकप्रिय राष्ट्रीय ब्रँड्सपासून ते सुप्रसिद्ध स्थानिक पदार्थांपर्यंत जेवणाच्या विस्तृत पर्यायांचा लाभ घेता येईल - ते नेहमीचे जेवण निवडू शकतील किंवा त्यांच्या मार्गावर प्रादेशिक वैशिष्ट्यांचा शोध घेऊ शकतील. ही सेवा प्रवाशांना त्यांच्या पसंतीचे जेवण सहजपणे ऑर्डर करण्याची आणि ते थेट त्यांच्या सीटवर किंवा बर्थवर पोहोचवण्याची सोय देऊन रेल्वे प्रवास अधिक सोयीस्कर बनवण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

## आईकू विशेष वर्धापनदिन ऑफर्स

नवी दिल्ली : उच्च-कार्यक्षमतेचा स्मार्टफोन ब्रँड आईकूआपला सहावा वर्धापनदिन एका मर्यादित कालावधीच्या वर्धापनदिन सेलसह साजरा करत आहे. ६ एप्रिल ते १० एप्रिल, २०२६ पर्यंत, ग्राहक अमेज़न.इन आणि आईकू.इन वर आईकू स्मार्टफोन्सवर आकर्षक ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात.गेल्या सहा वर्षांपासून, आईकू भारतातील तरुण आणि तंत्रज्ञान-प्रेमी ग्राहकांना शक्तिशाली आणि कार्यक्षमतेवर आधारित नवनवीन उत्पादने देण्यास वचनबद्ध आहे. या प्रवासाच्या केंद्रस्थानी ७० लाखांहून अधिक 'क्वेस्टर्स'चा एक मजबूत समुदाय आहे, ज्यांच्या अभिप्रायामुळे उत्पादने सुधारण्यास आणि विश्वास निर्माण करण्यास मदत होते. ग्राहक आईकू ई-स्टोअर आणि अमेज़न.इन वर या ॲनिव्हर्सरी ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात.

## सॅमसंगकडून कॅशबॅक

छत्रपती संभाजीनगर - - सॅमसंग हा भारतातील सर्वात मोठा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड १० एप्रिलपासून नवीन लाँच करण्यात आलेले गॅलेक्सी ए57 ५जी आणि गॅलेक्सी ए37 ५जी स्मार्टफोन्सच्या विक्रीला सुरूवात करणार आहे. नवीन ए सिरीजमध्ये तरूण वापरकर्त्यांसाठी प्रमुख डिवाईसेसमधील क्षमतांचा समावेश आहे, जे टिकाऊ व आकर्षक स्लिम फॉर्म फॅक्टरमध्ये फोटोग्राफी, कार्यक्षमता आणि एआय-समर्थित वैशिष्ट्यांना महत्त्व देतात.गॅलेक्सी ए57 ५जी ऑसम नेव्ही, ऑसम आइसीब्ल्यू आणि ऑसम लिलाक या तीन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध आहे.

# कन्नड विविध कार्यकारी सेवा सोसायटीवर परिवर्तन पॅनेलचे वर्चस्व; चेअरमन-व्हाइस चेअरमन बिनविरोध



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०९ एप्रिल - कन्नड येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमन व व्हाइस चेअरमन पदाच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनेलच्या वर्चस्वाखाली बिनविरोध निवड पार पडली. या निवड प्रक्रियेत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये एकमत झाल्यामुळे निवडणूक शांततेत आणि निर्विघ्नपणे पूर्ण झाली.

परिवर्तन पॅनेलचे प्रमुख भरत जाधव, उद्धव पवार यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक पार पडली. चेअरमनपदी रुक्मण रामराव जाधव यांची तर व्हाइस चेअरमनपदी अ. समद शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून सुनील कासतोडे यांनी कामकाज पाहिले.

या निवडीदरम्यान संस्थेचे अनेक सदस्य आणि पदाधिकारी उपस्थित होते.नगरसेविका अल्का भरत जाधव, गोविंद मैराळ, बाबुलाल गोरे, सुरेश सुरे, रामनाथ जाधव, उद्धव पवार,स्वाती पवार, शिवराम निकाळजे,नामदेव शिरसे आदींसह इतर सदस्यांनी उपस्थित राहून निवड प्रक्रियेला साक्षीदार राहिले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन व सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

नवनिर्वाचित चेअरमन व व्हाइस चेअरमन यांनी संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सभासदांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा विश्वास व्यक्त केला. सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी पारदर्शकता, शिस्त आणि एकजूट यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सदस्यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक असून, आगामी काळात विविध विकासात्मक उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. बिनविरोध निवड झाल्यामुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, संस्थेच्या कामकाजाला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**जाहिर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर**

सिव्हिल एम ए. क्र १८०/२०२६

अर्जदार :- १) जाहीदाबेगम अब्दुल मनियार उर्फ शेख वय ८५ वर्ष धंदा निरंक, रा. लासुरनाका जवळ महात्मा फुलेनगर गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) मंजूर अब्दुल मनियार उर्फ शेख वय ७६ वर्ष धंदा मजुरी रा. मन्सुरी कॉलनी ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) मन्सुर अब्दुल मनियार उर्फ शेख वय ६० वर्ष धंदा शेती रा. लासुरनाका जवळ महात्मा फुलेनगर गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) महेमुद अब्दुल मनियार उर्फ शेख वय ४० वर्ष धंदा शेती रा. लासुरनाका जवळ महात्मा फुलेनगर गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ह.मु. वडझिरे ता. सिन्नर जि.नाशिक ५) दाऊद अब्दुल मनियार उर्फ शेख वय४२ वर्ष धंदा शेती रा. लासुरनाका जवळ महात्मा फुलेनगर गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ह.मु. वडझिरे ता. सिन्नर जि. नाशिक ६) समिना बेगम मोहम्मद अफसर वय ४७ वर्ष धंदा घरकाम रा.एस टी. कॉलनी कट कट गेट जवळ, हात्तेसिंग पुरा औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.बी. सावंत यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत मा. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे असे की, अर्जदार क्र १ ह्या मयत अब्दुल रज्जाक मनियार उर्फ शेख यांच्या पत्नी असून अर्जदार क्र २ ते ६ हे त्यांची मुले आहेत मयत नामे मयत अब्दुल रज्जाक मनियार उर्फ शेख हे मौजे, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथील रहिवाशी होते व ते दिनांक २९/११/२०२५ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार क्र. १ ते ६ शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. तसेच मयत अब्दुल रज्जाक मनियार उर्फ शेख यांचे आई वडील हे देखील या पूर्वीच मयत झालेले आहे. मयत अब्दुल रज्जाक मनियार उर्फ शेख यांना अर्जदार क्र. ६ ही विवाहित मुलगी आहे. मयत मयत अब्दुल रज्जाक मनियार उर्फ शेख यांना अर्जदार क्र. १ ते ६ यांच्या व्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहेत. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल, प्रगटण माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी दिले. आहे. करीता हे जाहिर प्रगटन.

प्रकरणात पुढील तारीख ०५/०५/२०२६

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर गंगापुर

धाराशिव

# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री तुळजाभवानी मातेला ५ तोळ्याचे मंगळसूत्र अर्पण

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.९ एप्रिल -

पुणे जिल्ह्यातील गणेश नगर, सोरपटवाडी येथील मनिषा अंकुश धामे यांनी गुरुवार दिनांक ९ एप्रिल रोजी श्री तुळजाभवानी देवीच्या चरणी ५१.८४० ग्रॅम म्हणजे जवळजवळ पाच तोळे वजनाचे मंगळसूत्र



अर्पण केले. मनिषा धामे या गुरुवारी सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी आल्या होत्या. दर्शनानंतर त्यांनी श्री तुळजाभवानी देवींला मंगळसूत्र अर्पण केले.

यावेळी धार्मिक विभागाचे विकास वाणी, महेश गंजे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.



# शाळा विलिनीकरणाविरोधात पालकांचा संताप





### निषेध फेरी काढत आंदोलन...

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.९ एप्रिल -

नळदुर्ग येथील जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेतील शालेय व्यवस्थापन समिती व पालकांनी प्राथमिक व माध्यमिक शाळांचे विलिनीकरण करण्याच्या शासन निर्णयाविरोधात शहरात निषेध फेरी काढत संविधान चौक येथे आंदोलन केले.

वास्तविक, नळदुर्ग येथील जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेत पूर्वीपासूनच मुला-मुलींचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. शासन निर्णयानुसार एकाच कॅम्पसमधील मुला-मुलींच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांचे विलिनीकरण करण्याची तरतूद आहे. मात्र, सदर शाळा आधीपासूनच एकत्रित असल्याने हा निर्णय लागू करणे अन्यायकारक असल्याचे पालकांचे मत आहे.

तसेच शाळेची पटसंख्या, शैक्षणिक गुणवत्ता, वातावरण व भौतिक सुविधा चांगल्या असल्याने अनेक पालक या शाळेकडे वळत आहेत. तरीही विलिनीकरणाचा निर्णय कायम राहिल्यास आपली मुले खासगी शाळेत टाकण्याचा इशारा पालकांनी दिला आहे. या आंदोलनास विविध संघटना, पत्रकार व नागरिकांनी पाठिंबा दिला. आंदोलनादरम्यान शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष पुदाले, सदस्य प्रमोद कुलकर्णी व कविता कलशेट्टी यांनी मार्गदर्शन केले. तसेच पालक वसीम काझी, मुर्तजा शेख व सरदारसिंग ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी समितीचे सदस्य मारुती वाघमारे, नेताजी महाबोले, गौस बागवान, अबुसलाम शेख, साबिया बागवान, मर्जीना शेख, आलिया शेख, शांताबाई वाघमारे, योगिता डुकरे, संजय डुकरे, भगवंत सुरवसे यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागण्यांचे निवेदन मंडळ अधिकारी व केंद्र प्रमुख यांनी स्वीकारले असून, यावेळी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# अयोध्येच्या धर्तीवर तुळजाभवानी मंदिराचा भव्य विकास : १८६५ कोटींच्या आराखड्याला गती मिळणार

- मे महिन्यात तुळजाभवानी मंदिर विकास कामांचे होणार भूमिपूजन; धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती...
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्राताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.९ एप्रिल -

कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मंदिर परिसराचा विकास अयोध्येतील राम मंदिराच्या धर्तीवर भव्य व दिव्य स्वरूपात करण्यासाठी राज्य शासनाने मोठी पावले उचलली आहेत. या विकास आराखड्यांतर्गत विविध कामांचे भूमिपूजन मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पार पडणार असल्याची माहिती पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

याप्रसंगी आमदार राणाजगजीतसिंह पाटील, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हालंदकर उपस्थित होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्राताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत या प्रकल्पाला गती देण्याचे निर्देश देण्यात आले.

राज्य शासनाने सुमारे १८६५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी दिली असून त्यापैकी ४२१ कोटी रुपयांच्या कामांसाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे. विकासासाठी बाधित होणाऱ्या १०५ खाजगी मालमत्तांपैकी सुमारे ७५ टक्के मालमत्ता धारकांशी शासनाने यशस्वी वाटाघाटी केल्या आहेत.

मंदिर परिसरात होणाऱ्या प्रमुख कामांमध्ये आठ प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार,आठ कुंडांचे पुनरुज्जीवन, पार्किंग प्लाझा उभारणी, प्रमुख रस्त्यांचे सुशोभीकरण, भक्तनिवास व दर्शन मंडप.रामदरा तलावाजवळ 'शिवसृष्टी' उद्यान यांचा समावेश आहे. पालकमंत्री सरनाईक यांनी अयोध्येच्या धर्तीवर नियोजन करताना वेळेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. तसेच तुळजापूर शहराचा झपाट्याने होणारा विस्तार लक्षात घेता स्वतंत्र 'मास्टर प्लॅन' तयार करण्यावरही भर देण्यात आला आहे.

महापुरुषांच्या पुतळ्यांबाबत अनधिकृत उभारणीमुळे सामाजिक तणाव निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले. शासनाच्या निकषांनुसारच पुतळे उभारण्यासाठी इच्छुकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. बैठकीत यासोबतच मुख्यमंत्री शेतकरी सौर पंप योजना, जलजीवन मिशन, मृद व जलसंधारण, तसेच कायदा व सुव्यवस्था यांसारख्या विषयांवरही सविस्तर आढावा घेण्यात आला.

एकूणच, तुळजाभवानी मंदिर परिसराचा हा विकास प्रकल्प धार्मिक पर्यटनाला मोठी चालना देणार असून तुळजापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## माकणी येथे आंबेडकर जयंती उत्सव समितीची बिनविरोध निवड

लोहारा, दि.९ एप्रिल -

लोहारा तालुक्यातील माकणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची बैठक घेऊन नव्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली.

या बैठकीत अध्यक्षपदी रोहीत गायकवाड, उपाध्यक्षपदी स्वप्निल जाधव, सचिवपदी आकाश कांबळे, सहसचिवपदी अनिरुद्ध जाधव, कोषाध्यक्षपदी किशोर गायकवाड यांची निवड करण्यात आली. तसेच संघटक म्हणून सुजित माकणीकर, मिरवणूक प्रमुख विकास कांबळे, सहकोषाध्यक्ष सागर जाधव, संघटक सुमित जाधव तसेच सदस्य म्हणून आयुष जाधव व पियुष जाधव यांची निवड करण्यात आली. याशिवाय प्रमोद कांबळे यांच्यावर मिरवणुकीची जबाबदारी सोपवण्यात आली असून किशोर गायकवाड यांना आधारस्तंभ तर अविनाश कांबळे यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून नियुक्त करण्यात आले.

## उमरग्यात एसटी कर्मचाऱ्यावर मारहाण; निषेधार्थ काळ्या फिती लावून आंदोलनाचा इशारा



तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.९ एप्रिल -

येथील बसस्थानकातील वाहतूक नियंत्रकावर झालेल्या मारहाणीच्या घटनेच्या निषेधार्थ उमरगा आगारातील एसटी कर्मचाऱ्यांनी दि. ९ रोजी काळ्या फिती लावून निषेध नोंदवला. संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन पोलीस निरीक्षक व मा.आ.ज्ञानराज चौगुले यांना देण्यात आले.

निवेदनानुसार, बसस्थानकात वाहतूक नियंत्रण पदावर कार्यरत असलेले जे.आर. गायकवाड हे कामावर असताना नागूर बस संदर्भात चौकशीसाठी आलेल्या प्रवाशाला त्यांनी समाधानकारक माहिती दिली. मात्र, त्यानंतर कोणतेही कारण नसताना एका व्यक्तीने गायकवाड यांना अमानुष मारहाण केली. या घटनेमुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये भीती व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, दैनंदिन वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याचा फटका प्रवाशांनाही बसू शकतो, असे कर्मचाऱ्यांनी सांगितले. यापूर्वीही अवैध वाहतूक करणाऱ्या खाजगी चालकांकडून एसटी कर्मचाऱ्यांना दमदाटी करून शासकीय कामात अडथळा आणण्याच्या घटना घडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर घटनेतील सीसीटीव्ही फुटेज तपासून सखोल चौकशी करावी व संबंधित आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करावी, अन्यथा एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनावर दिगंबर सुरवसे, सुधाकर अदटराव, संजय कुंभार, ए.के. पाठक, व्ही.व्ही. चव्हाण, व्ही.डी. अंबर, अतुल बारभाई, अमोल कुंभार, अमोल सूर्यवंशी, एल.टी. कांबळे, एस.सी. हंचाटे, यशवंत पाटील, मल्लिनाथ कलशेट्टी आदींच्या सह्या आहेत.

## माकणी येथे आंबेडकर जयंती उत्सव समितीची बिनविरोध निवड

लोहारा, दि.९ एप्रिल -

लोहारा तालुक्यातील माकणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची बैठक घेऊन नव्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली.

या बैठकीत अध्यक्षपदी रोहीत गायकवाड, उपाध्यक्षपदी स्वप्निल जाधव, सचिवपदी आकाश कांबळे, सहसचिवपदी अनिरुद्ध जाधव, कोषाध्यक्षपदी किशोर गायकवाड यांची निवड करण्यात आली. तसेच संघटक म्हणून सुजित माकणीकर, मिरवणूक प्रमुख विकास कांबळे, सहकोषाध्यक्ष सागर जाधव, संघटक सुमित जाधव तसेच सदस्य म्हणून आयुष जाधव व पियुष जाधव यांची निवड करण्यात आली. याशिवाय प्रमोद कांबळे यांच्यावर मिरवणुकीची जबाबदारी सोपवण्यात आली असून किशोर गायकवाड यांना आधारस्तंभ तर अविनाश कांबळे यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून नियुक्त करण्यात आले.

## भूममध्ये गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक उघड

तभा वृत्तसेवा
भूम, दि.९ एप्रिल -

शासकीय दूध डेअरी जवळील रस्त्यावर गोवंशीय जनावरांची क्रूरपणे बेकायदेशीर वाहतूक केल्याप्रकरणी भूम पोलिसांनी कारवाई करत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.





या प्रकरणी आरोपी तानाजी भिकाजी सोनवणे (वय ३८, रा. भोनगिरी ता. भूम जि. धाराशिव) यांनी दि.८ एप्रिल २०२६ रोजी सुमारे १३.५० वाजण्याच्या सुमारास पिकअप (क्र. एमएच २५ जे १८३५) मधून गोवंशीय जातीच्या ४ जर्सी गायी (एकूण किंमत अंदाजे ४०,००० रुपये) क्रूरपणे भरून, त्यांना चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीररित्या वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले.

यावरून भूम पोलिसांनी कारवाई करत संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणी पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## पार्किंगमध्ये मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

तुळजापूर, दि.९ एप्रिल -

येथील पार्किंग परिसरात भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या युवकाला पाच जणांनी मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दि.५ एप्रिल रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास फिर्यादी भगवान अनिल पारधे (वय ३२, रा. वेताळ नगर, तुळजापूर) हे गणेश कांबळे यास काहीजण मारहाण करत असल्याची माहिती मिळाल्याने घटनास्थळी गेले होते. यावेळी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण करून त्यांना जखमी केले. या प्रकरणी सुरज रसाळ, चिंता रसाळ, आशिष पवार, किरण गवते व अक्षय परमेश्वर (रा. तुळजापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माणकेश्वरमध्ये जनआरोग्य समितीची बैठक संपन्न

### ग्रामीण आरोग्य सेवांना गती देण्यावर भर...



तभा वृत्तसेवा
भूम, दि.९ एप्रिल -

तालुक्यातील माणकेश्वर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र जनआरोग्य समितीची पहिली बैठक दि.८ रोजी पार पडली. जिल्हा परिषद सदस्या साधना अंधारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आरोग्य केंद्राचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत सध्या उपलब्ध असलेल्या सुविधा तसेच भविष्यातील नियोजित सुविधा व उपाययोजनांचा आराखडा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अमोल शिनगारे यांनी मांडला. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक दर्जेदार, वेळेवर आणि प्रभावी करण्यावर समितीने विशेष भर दिला. नागरिकांना गावातच दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यावरही चर्चेतून स्पष्ट भर देण्यात आला. १०२ आपत्कालीन सेवा, लसीकरण सुविधा, नवीन यंत्रणेद्वारे १०० पेक्षा अधिक चाचण्या तसेच महिला, बालक व सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा, यासाठी कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीनंतर प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करून नागरिकांना कोणतीही अडचण असल्यास लोकप्रतिनिधींशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी पंचायत समितीच्या नवनियुक्त सभापती पूजा ढगे, पंचायत समिती सदस्य मनोज अंधारे तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येरमाळ्यात सोन्याची चैन चोरी

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.९ एप्रिल -

येथील चुन्याच्या रान परिसरात एका व्यक्तीच्या गळ्यातील सोन्याची चैन अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली आहे.

फिर्यादी तेजस चंद्रकांत मोटे (वय ३०, रा. अंबर हाईट्स, जि. ठाणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या गळ्यातील अंदाजे ८५ हजार रुपये किमतीची सोन्याची चैन अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. या प्रकरण गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

## जगदाळवाडी शाळेत स्वयंशासन दिन व निरोप समारंभ उत्साहात



तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.९ एप्रिल -

जगदाळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वयंशासन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याचवेळी इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभही भावपूर्ण वातावरणात पार पडला.

स्वयंशासन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत जबाबदाऱ्या सांभाळल्या. सृष्टी लिंबोळे हिने मुख्याध्यापकाची भूमिका समर्थपणे पार पाडली, तर इतर विद्यार्थ्यांनी विविध विषयांचे अध्यापन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व नेतृत्वगुणांचा विकास झाला.

निरोप समारंभात आठवीच्या विद्यार्थ्यांनी शालेय आठवणींना उजाळा देत भावनिक वातावरण निर्माण केले. काही विद्यार्थ्यांनी विनोदी आठवणी सांगत उपस्थितांना हसवले. कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांना मसाला भात व दूध खीर देण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून परमेश्वर शिंदे व दिलीप मगे यांनी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल चव्हाण, तर आभार प्रदर्शन अश्विनी चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक विष्णू जाधव यांच्यासह शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## अणदूरमध्ये सामाजिक समता सप्ताहाची उत्साहात सुरुवात



तभा वृत्तसेवा
अणदूर, दि.९ एप्रिल -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाची सुरुवात जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अणदूर येथे उत्साहात करण्यात आली.

या कार्यक्रमात विद्यार्थी व शिक्षकांनी मनोगत व्यक्त करताना श्रेया मुळे, तनिष्का पात्रे, प्रचिती मटगे, रेवती गायकवाड, पंचशीला कांबळे तसेच प्रा. प्रशांत भागवत यांनी डॉ. आंबेडकर यांचे बालपण, शैक्षणिक वाटचाल, सामाजिक कार्य, सामान्यांप्रती असलेली तळमळ आणि भारतीय संविधान निर्मितीतील त्यांचे मोलाचे योगदान यावर प्रकाश टाकला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा तसेच वाचाल तर वाचाल या त्यांच्या विचारांचा विशेष उल्लेख करण्यात आला. बहिष्कृत समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहितीही यावेळी देण्यात आली. सामाजिक समता सप्ताहानिमित्त वक्ते लिंबाजी सुरवसे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, डॉ. आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध लढा दिला. भारतीय संविधानात शिक्षण हा मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट करून त्यांनी सर्वसामान्यांसाठी शिक्षणाची दालने खुली केली. गोर-गरीब, मागासवर्गीय आणि महिलांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला.

अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक कुलकर्णी यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकर यांच्या योगदानामुळे भारतीय लोकशाही अधिक भक्कम झाली आहे. संविधानावर आधारित प्रशासन ही त्यांच्या कार्याची देण आहे. त्यांनी समाजातील अन्याय-अत्याचारांविरुद्ध आवाज उठवून सामाजिक परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या साहित्याचा व विचारांचा अभ्यास करून त्यांच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी आवाहन केले.

या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सिध्देश्वर मसुते यांनी केले.

## अग्रलेख...

# पोषणमूल्यांचे विषम वास्तव

जे वढी पोषणमूल्ये श्रीमंतांच्या शाम्पूत असतात, त्याच्या एक दशांशही गरिबांच्या जेवणात नसतात, असे सामाजिक विषमतेचे भाष्यकार अनेक वेळा सांगत असतात. जगात आणि देशात वाढत चाललेल्या विषमतेचे हे विदारक सत्य. 'वर्ल्ड इनइक्वाालिटी लॅब'चा समोर आलेला ताजा अहवाल असे सांगतो की, केवळ १० टक्के श्रीमंतांच्या ताब्यात तब्बल ४४ टक्के जमीन आहे! हा अहवाल खरोखर डोळ्यात अंजन घालणारा आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत किंवा प्रगतिशील समजल्या जाणाऱ्या राज्यात ४८.१ टक्के ग्रामीण कुटुंबांकडे जमीन नसणे, हे लोकशाहीतल्या समान संधीच्या संकल्पनेला हरताळ फासणारे आहे. जेथे 'अन्नदाता सुखी भव'ची कामना केली जाते, त्याच देशाच्या ग्रामीण भागातील ४६ टक्के कुटुंबे भूमिहीन आहेत, हा आणखी एक धक्का.

ग्रामीण भारताचा 'गिनी इंडेक्स' ७१ वर पोहोचला आहे. हे विषमता मोजण्याचे प्रमाण आहे. खरे तर, देशाच्या स्वातंत्र्याला ७९ वर्षे पूर्ण होत असताना विषमतेचे मोजमाप करावे लागत आहे, हेच मुळात दुर्दैव आहे. ही आकडेवारी सामाजिक विषमतेचा आरसा असून, त्याचा भयाण चेहरा बदलण्याची गरज आहे. देशातील सर्वांत श्रीमंत असलेल्या १ टक्का लोकांकडे १८ टक्के जमिनीचा मालकी हक्क आहे, तर दुसरीकडे शेतीवर आधारित अर्थव्यवस्था असतानाही निम्म्याहून अधिक जनता भूमिहीन आहे, हे चिंताजनक मानले पाहिजे. ग्रामीण भागात जाऊन शेती विकत घेण्यासाठी थोडी विचारपूस केली तर बहुतांश असे सांगितले जाते की, ही जमीन शहरात राहणाऱ्या अमुक अमुक श्रीमंत माणसाची आहे. कोणे एकेकाळी ती त्याच जमिनीवर राबणाऱ्या शेतमजुराची होती, अशीही माहिती समोर येते. एखाद्या गावात विकासाचा प्रकल्प येणार असेल, तर त्याची पूर्वकल्पना राजकीय नेत्यांना, श्रीमंतांना आधीच येत असल्याने आणि मूळ शेतकरी त्यापासून अनभिज्ञ असल्याने तो थोड्याशा वाढीव पैशात ती जमीन विकतो. कालांतराने त्याला कळते की तीच जमीन प्रकल्पात गेली आणि आता त्या जमिनीसाठी नव्या मालकाला लाखो किंवा कोट्यवधी रुपये मिळताहेत. टाळूवरचे लोणी खाणारा हा व्यवसाय. अशा विषमतांचे वास्तव 'वर्ल्ड इनइक्वालिटी लॅब'सारख्या संस्थांच्या अहवालात दिसते. काही गावांमध्ये तर ५० टक्क्यांच्याही वर जमीन एकाच मालकाच्या नावे आहे, असे हा अहवाल सांगतो. ज्या भागात एकेकाळी जमीनदारी किंवा संस्थानिकांची सत्ता होती, तेथे जमिनीचे केंद्रीकरण आजही जसेच्या तसे आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उलटूनही काळातही आपण गुलामगिरीच्या साखळदंडातून खरेच पूर्णपणे मुक्त झालो आहोत का, असा प्रश्न विचारायला भाग पाडणारी ही आकडेवारी आहे.

खरे तर, विषमतेचे हे लोण केवळ शेतजमिनीपर्यंत मर्यादित नाही. नैसर्गिक संसाधनांवरही काही ठरावीक घटकांचे वर्चस्व निर्माण झाले आहे. ज्यांना गरज नाही, त्यांच्या दारात चार-चार आलिशान गाड्या उभ्या आहेत, पण जो दिवसभर कष्ट उपसतो त्याला सायकल घेणेही दुरापास्त आहे. एकीकडे श्रीमंतांच्या बंगल्यातील जलतरण तलाव पाण्याने ओसंडून वाहत आहेत, तर दुसरीकडे गरिबांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक मैल पायपीट करावी लागत आहे. शहरी भागात राहणाऱ्यांना हे कटु वास्तव दिसणार नाही. थोडे गावात गेलो तर असे कसे काय सुरू आहे, असा प्रश्न उभा झाल्याशिवाय राहणार नाही. आज आपण अशा जगात जगत आहोत, जिथे पाळीव कुत्र्यांच्या बिस्किटांवर आणि त्यांच्या 'हेल्थ सप्लिमेंट्स'वर होणारा खर्च, एका शेतमजुराच्या महिनाभराच्या कमाईपेक्षा कितीतरी जास्त आहे. 'ऑक्सफॅम'च्या अहवालानुसार, भारतातील सर्वांत श्रीमंत १ टक्का लोक, खालच्या स्तरातील ५० टक्के लोकांच्या तुलनेत कितीतरी पटीने अधिक कार्बन उत्सर्जित करतात. ज्यांच्या घरात चार लोक आहेत, त्यांच्या दारी अर्धा डझन गाड्या. या गाड्यांसाठी लागणारी जागा, इंधन आणि त्यातून निर्माण होणारे प्रदूषण याचा भार निसर्गावर आणि पर्यायाने गरिबांवर पडतो. स्विमिंग पूल, गार्डन इत्यादी सुखसोईंनी युक्त असलेल्या शहरातल्या सुखवस्तू इमारतीत राहणाऱ्या एका कुटुंबाचा दिवसभराचा पाण्याचा वापर किमान ५००० लिटर असतो. त्याच शहराच्या एका लहानशा वस्तीत राहणाऱ्या कुटुंबाला ५० लिटर पाण्यासाठी दोन तास रांगेत उभे राहावे लागते. संसाधनांचे हे 'हायजॅकिंग' म्हणजेच आपल्या कथित कल्याणकारी लोकशाहीचे मोठे अपयश आहे.

'हुरून इंडिया'च्या आणखी एका अहवालानुसार, भारतातील अब्जाधीशांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र, त्याचवेळी देशातील ७० टक्के लोकांकडे स्वतःचे हक्काचे घर किंवा पुरेशी जमीन नाही. कारण ती त्यांच्या उत्पन्नाच्या आवाक्यातच येत नाही. त्यामुळे विशेषतः गावात किंवा शहरातही, जमिनीची मालकी ही बहुतांशी श्रीमंतांकडेच दिसते. जमिनीच्या वितरणाची विषमता वाढते तेव्हा अन्नाची सुरक्षाही धोक्यात येत असते. ज्याच्याकडे जमीन नाही, त्याला शेतमजूर म्हणून राबावे लागते. बाजारात महागाई वाढली की, सर्वांत आधी गरिबाच्या ताटातली भाजी गायब होते. बाजारात मिळणारी महागडी फळे अत्तराचे दिवे लावणाऱ्यांच्या 'फेस पॅक'मध्ये वापरली जातात आणि दुसरीकडे त्याच फळांकडे आ वासून पाहणाऱ्या गरिबांच्या पोरांना कुपोषणाशी लढावे लागते, हे या व्यवस्थेचे मोठे विडंबन आहे. ते गोंडस नावांखाली लपवले जात आहे, हे त्याहीपेक्षा चिंताजनक आहे. विषमतेची ही दरी संधींच्याही बाबतीत आहे. ज्यांच्याकडे संसाधने आहेत, त्यांच्या पाल्यांना परदेशातील शिक्षण सहज मिळते, तर भूमिहीन शेतमजुराचे लेकरू जिल्हा परिषदेच्या शाळेतील साध्या सोईसुविधांसाठीही आसुसलेले असते. श्रीमंत असणे चुकीचे नाही. पण सर्वांना संपन्न होण्याची समान संधी मिळाली पाहिजे. पैसा पैशाला ओढतो, ही संकल्पना खरी असेल, तर अशी संधी गरिबांना सापडणे दुरापास्तच. शेवटी तो आयुष्यभर चाचपडत जीवन जगतो आणि आपल्या पुढच्या पिढीलाही गरिबीचे देणे देत निघून जातो. पिढ्यान्‌पिढ्या हे असेच चालले आहे.

ज्या भागात जमिनी सुपीक आहेत, बाजारपेठा जवळ आहेत किंवा चांगले रस्ते आहेत, तेथेही विषमता कमी होण्याऐवजी वाढत आहे. विकासाचे 'मॉडेल' जर सर्वांना सामावून घेणारे नसेल, तर गुळगुळीत रस्त्यांना आणि बाजारपेठांना अर्थ काय? जमिनीचे न्याय्य वाटप हा केवळ आर्थिक मुद्दा नसून, तो सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत आणि गरीब लोक गरिबीच्या गर्तेत आणखीच रुतत चालले आहेत, ही अभिमान बाळगावा अशी गोष्ट खचीतच नाही. दुर्दैवाने, ती आपल्या व्यवस्थेची फलश्रुती आहे. जमीन सुधारणा कायद्यांची कडक अंमलबजावणी करून ही कोंडी फोडण्याची वेळ आली आहे. जमीन, पाणी, वीज आणि शिक्षण यासारख्या मूलभूत संसाधनांचे न्याय्य वाटप झाले पाहिजे. तळागाळातील माणसाला आर्थिक प्रवाहात आणण्यासाठीचे प्रयत्न खरे आहेत, याची खात्री त्याला पटली पाहिजे. शेवटी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ज्या समाजाचा पाया विषमतेच्या विटांवर रचला जातो, तो समाज दीर्घकाळ तग धरू शकत नाही. आज आपण अशा वळणावर आहोत, जिथे एका बाजूला 'पॅकेज'ची चकाकी आहे आणि दुसरीकडे आत्महत्येच्या प्रश्नाचा भयाण काळोख आहे. सामाजिक न्यायासाठी मोफत योजना ठीक. पण अशा तात्पुरत्या योजना गरिबांचा, भूमिहिनांचा भाग्योदय करू शकत नाहीत. कष्टाने, स्वाभिमानाने उभा राहणारा समाज भारतात आहे. केवळ संधीची सुलभता तेवढी त्याला दिली जावी. संसाधनांचे न्याय्य वाटप व्हावे. येत्या काळात जनगणना होणार आहे. त्यातून समाजाच्या विभिन्न स्तराची प्रत्यक्ष आकडेवारी पुढे येईलच. त्याचे विश्लेषणही होईल. त्यानंतर तरी मागे पडलेल्यांना, भूमिहिनांना, शेतमजुरांना, गरिबांना यथायोग्य संधी आणि न्याय देण्याच्या दिशेने पावले उचलली जातील, अशी आशा करूया. श्रीमंतांच्या शाम्पूतली पोषणमूल्ये कुण्या गरिबाच्या ताटात टाकूया.

## प्रासंगिक

# चला, स्त्री-शक्तीला सक्षम करूया!

**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

ये त्या काही दिवसांत भारत सण-उत्सवांच्या वातावरणात न्हाऊन निघालेला असेल, यानिमित्ताने देशाच्या कानाकोपऱ्यात विविध सोहळे साजरे केले जातील. आसामचे लोक रोंगाली बिहू साजरा करतील, तर ओडिशामध्ये महा बिशुबा पान संक्रांती साजरी होईल. पश्चिम बंगालमध्ये पोईला बैशाखपासून बंगाली नववर्षाची सुरुवात होईल. तर केरळम्‌मध्ये अत्यंत उत्साहात विशु साजरा केला जाईल. तामिळनाडूमध्ये, पुथांदुची लगबग तर, पंजाब आणि एकूणच उत्तर भारतात बैसाखीचा उत्साह असेल. हे सगळे सण-उत्सव देशभरात आशा आणि सकारात्मकतेचे नवे चैतन्य निर्माण करणारे ठरतील. हे सणवार साजरे करणाऱ्या देशभरातील आणि देशाबाहेरच्याही भारतीयांना मी हार्दिक शुभेच्छा देतो. हे पवित्र उत्सव, सगळ्यांच्याच आयुष्यात आनंद आणि समृद्धी घेऊन येणारे ठरोत.

त्याशिवाय, ११ एप्रिलला, आपण महात्मा फुले यांची २०० वी जयंती साजरी करणार आहोत, तर १४ एप्रिलला आंबेडकर जयंतीनिमित्त, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहणार आहोत. या अशा विशेष प्रसंगांसह, जेव्हा पुनरुज्जीवनाची भावना आपल्या मनामनांत भरून वाहत असेल, अशाच वेळी आपण आणखी एका ऐतिहासिक घटनेच्या उंबरठ्यावर उभे असणार आहोत. हा प्रसंग म्हणजे, आपल्या लोकशाहीचा पाया अधिक सखोल करण्याची आणि समता तसेच सर्वसमावेशकतेविषयीच्या आपल्या सामूहिक संकल्पाला अधिक मजबूत करण्याची आपली संधी असेल.

येत्या १६ एप्रिलला, संसदेचे एक विशेष सत्र बोलावले जाणार असून, त्यात, महिला आरक्षणाला गती देणाऱ्या विशेष विधेयकावर चर्चा होऊन ते संमत केले जाणार आहे.

ही केवळ एक वैधानिक प्रक्रिया असेल, असे म्हणणे म्हणजे त्याचे महत्त्व कमी करण्यासारखे आहे. या विधेयकात, देशभरातील कोट्यवधी महिलांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब पडलेले आहे. भारताचे सांस्कृतिक मर्म ज्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारलेले आणि चाललेले आहे, ते तत्त्व - जेव्हा स्त्री प्रगती करते, तेव्हा समाज प्रगती करतो - त्याचाच दृढनिश्चय यातून व्यक्त होत आहे

भारताच्या लोकसंख्येत, निम्मा वाटा महिलांचा आहे. देशासाठी त्यांनी दिलेले योगदान अत्यंत व्यापक आणि मौल्यवान आहे. आज आपण, प्रत्येक क्षेत्रात महिलांनी साध्य केलेल्या अद्वितीय कर्तृत्वाचा अनुभव घेत आहोत. विज्ञान असो की तंत्रज्ञान किंवा मग उद्यमशीलता. खेळ असो किंवा मग लष्करी दले, संगीतापासून कलेपर्यंत, सगळ्या क्षेत्रांत, भारताच्या प्रगतीत महिलांचा सिंहाचा वाटा आहे. गेल्या काही वर्षांत, महिलांच्या सक्षमीकरणासाठी पोषक वातावरण देशात निर्माण होईल, यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न जाणीवपूर्वक केले जात आहेत. शिक्षणाची वाढलेली उपलब्धता, आरोग्यात सुधारणा, वित्तीय समावेशनात वाढ, महिलांसाठीच्या पायाभूत सुविधांमधे वाढ, यामुळे आर्थिक आणि सामाजिक जीवनात, महिलांचा सहभाग वाढण्याचा पाया रचला गेला आहे.



मात्र, तरीही, राजकीय क्षेत्रात, विशेषतः विधिमंडळ संस्थांमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व हे, महिलांची समाजातील संख्या आणि भूमिकेला अनुसरून कधीही राहिलेले नाही. त्यांचा सहभाग नसणे ही आपल्यासाठी दुर्दैवाची गोष्ट यासाठी आहे की जेव्हा महिला प्रशासन आणि निर्णयप्रक्रियेत सहभागी होतात, त्यावेळी, त्या त्यांचे स्वतःचे अनुभव त्यात जोडतात आणि धोरण/निर्णयाला एक वेगळा दृष्टिकोन देतात, जो सार्वजनिक आयुष्याला समृद्ध करतो आणि प्रशासनाची गुणवत्ताही वाढवतो. २०२९ च्या लोकसभा आणि विविध राज्यांतील विधानसभा निवडणुका महिला आरक्षणासह होणार आहेत, हे तर निश्चितच आहे. गेल्या काही दशकांत, आधीच्या सरकारांकडूनही, लोकशाही संस्थांमध्ये, महिलांना त्यांचे यथोचित स्थान देण्याचे प्रयत्न सातत्याने करण्यात आले. समित्या स्थापन केल्या गेल्या, विधेयकांचे मसुदे मांडले गेले, पण त्यांनी कधी दिवसाचा उजेड पाहिलाच नाही. मात्र, कायदेमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व वाढले पाहिजे, यावर एक व्यापक सहमती कायम राहिली. सप्टेंबर २०२३ मध्ये, संसदेने याच सहमतीच्या भावनेतून नारी शक्ती वंदन अधिनियम संमत केला. या घटनेला मी माझ्या आयुष्यातील सर्वांत विशेष घटनांपैकी एक मानतो.

महिला आरक्षणाची सुनिश्चिती करणारी ही संधी आपल्या राज्यघटनेच्या भावनेशी देखील अत्यंत दृढतेने जोडलेली आहे. जिथे समानता केवळ राज्यघटनेतच अंतर्भूत नसेल, तर ती प्रत्यक्ष समाजाच्या आचरणात देखील अनुभवता येईल अशा प्रकारच्या समाजाची कल्पना आपल्या राज्यघटनाकारांनी मांडली होती. कायदेमंडळांमध्ये महिलांच्या सहभागाला बळकटी देणे हे त्या स्वप्नाच्या पूर्ततेच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊलच आहे. प्रत्येक नागरिकाचा देशाचे भवितव्य घडवण्याच्या प्रक्रियेत समान वाटा असेल, असा समाज घडवण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे हे प्रतिबिंब आहे.

हा एक असा क्षण आहे ज्या बाबतीत आता अधिक काळ चालढकल करता येणार नाही. महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याच्या बाबतीत होत असलेला प्रत्येक विलंब हा खरे तर आपल्या लोकशाहीचा दर्जा आणि सर्वसमावेशकतेला बळकटी देण्याला होत असलेला विलंब आहे. दशकानुदशके, कायदेमंडळांमध्ये महिलांचा अधिक सहभाग असायला हवा या गरजेची दखल घेतली गेली, त्यावर चर्चाही केल्या गेल्या, त्याबाबत वारंवार मांडणीही केली गेली. अशावेळी आता कृती करण्याला उशीर करणे म्हणजे आपल्याला ठावूक असलेला आपल्यातला असमतोल आणखी अधिक काळ लांबवण्यासारखे असणार आहे. महत्त्वाचे म्हणजे या असमतोलात सुधारणा घडवून आणण्याची क्षमता आपल्यात आहे. आज भारत आत्मविश्वास आणि ध्येयाने पुढे वाटचाल करतो आहे, अशा वेळी आपल्या संस्थांमध्ये सर्व नागरिकांच्या, विशेषतः आपल्या लोकसंख्येच्या अर्ध्या संख्येच्या आकांक्षांचे प्रतिबिंब उमटणे गरजेचे आहे. वेळेवर केलेल्या कृतीमुळे केवळ जुन्या वचनबद्धतेचा सन्मान राखला जाणार नाही, तर त्यासोबतच प्रगतीचा वेग देखील कायम राखला जाईल याची सुनिश्चिती होऊ शकणार आहे. आपली लोकशाही अधिक प्रातिनिधिक, प्रतिसाद देणारी आणि भविष्यासाठी सज्ज बनवण्याच्या दिशेने ही खरोखरच एक ऐतिहासिक संधी आहे.

हा क्षण सामूहिक कृतीची अपेक्षा करतो आहे. ही बाब कोणत्याही एका सरकारबद्दल, पक्षाबद्दल किंवा व्यक्तीबद्दल नाही. ही, आपण एक देश म्हणून, या पावलाचे महत्त्व ओळखून ते प्रत्यक्षात टाकण्यासाठी एकत्र येण्याची बाब आहे. हे आपण आपल्या महिला शक्तीला देऊ लागत असलेले देणे आहे. म्हणूनच, महिला आरक्षणाचे विधेयक हे जास्तीत जास्त व्यापक सहमतीने मंजूर झाले पाहिजे आणि मोठ्या राष्ट्रीय हिताने प्रेरित असले पाहिजे. अशा संधी आपल्याकडून स्वतःसाठी नाही, तर भावी पिढ्यांसाठी कृती करण्याची अपेक्षा करत असतात. लोकशाहीचे खरे सामर्थ्य हे काळाप्रमाणे बदलत जाण्याच्या आणि अधिक सर्वसमावेशक होण्याच्या क्षमतेमध्ये दडलेले असते, याचे स्मरणच त्या आपल्याला करून देत असतात.

संसदेच्या या ऐतिहासिक अधिवेशनाच्या पृष्ठभूमीवर, मी सर्व संसद सदस्यांना, सर्व पक्षाच्या सदस्यांना त्यांनी भारतातील महिलांसाठी उचलल्या जात असलेल्या या महत्त्वाच्या पावलाला पाठिंबा देण्यासाठी एकत्र यावे असे आवाहन करतो. चला, आपण उत्तरदायित्व आणि ध्येयनिष्ठतेच्या भावनेने या संधीचा लाभ घेऊया. चला, आपल्या लोकशाहीच्या अत्युच्च परंपरेचे प्रतिबिंब उमटेल अशा प्रकारची कृती आपण करूया.

जेव्हा जेव्हा राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांचा प्रश्न असतो, तेव्हा तेव्हा भारत, मतभेदांच्या पलीकडे जाऊन एकजुटीने कृती करतो ही बाब भारताने कायम दाखवून दिली आहे. हा एक तशाच प्रकारचा क्षण आहे. चला, आपण एकत्र पुढे वाटचाल करू या आणि घटनात्मक मूल्यांना बळकटी देऊया. तसेच, राष्ट्राच्या प्रगतीसाठी आपल्या महिला शक्तीला सक्षम करूया.

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# आरोग्यसंपन्न गावाची हाक!

म हाराष्ट्र शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचा शुभारंभ करून ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालेला हा शुभारंभ आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची उपस्थिती यामुळे या योजनेचे महत्त्व अधोरेखित होते. परंतु प्रश्न असा आहे की, या घोषणांमुळे खरोखरच ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सुधारेल का? ग्रामीण महाराष्ट्रात आजही आरोग्य व्यवस्थेचे चित्र चिंताजनक आहे. अनेक दुर्गम भागांत प्राथमिक आरोग्य केंद्रे कागदावर आहेत, पण प्रत्यक्षात डॉक्टर नाहीत, औषधे नाहीत, आणि आवश्यक सुविधा नाहीत. गडचिरोली, चंद्रपूर, नंदुरबार यासारख्या जिल्ह्यांमध्ये तर परिस्थिती अधिक बिकट आहे. अनेक गावांमध्ये आजही रुग्णांना २० ते ३० किलोमीटर अंतर पार करून उपचारासाठी जावे लागते. वेळेत उपचार न मिळाल्यामुळे अनेक निरपराध जीव गमवावे लागतात, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. डॉक्टरांची कमतरता ही ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील सर्वांत मोठी अडचण आहे.

शहरांमध्ये अत्याधुनिक रुग्णालये आणि तज्ज्ञ डॉक्टर सहज उपलब्ध असताना, गावाकडे प्राथमिक आरोग्यसेवाही अपुरी आहे. डॉक्टरांना दुर्गम भागात राहण्याची अनिच्छा, अपुरी पायाभूत सुविधा आणि सुरक्षिततेचे प्रश्न यामुळे ही समस्या अधिक गंभीर बनते. परिणामी, अनेक वेळा अपघात, प्रसूती किंवा गंभीर आजारांमध्ये रुग्णांना वेळेत उपचार मिळत नाहीत आणि मृत्यूचे प्रमाण वाढते. याशिवाय, संसर्गजन्य आजारांचा प्रश्नही ग्रामीण भागात गंभीर आहे. डेंग्यू, मलेरिया, क्षयरोग यासारखे आजार आजही मोठ्या प्रमाणावर आढळतात. स्वच्छ पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि स्वच्छता या मूलभूत बाबींचा अभाव असल्यामुळे या आजारांना आळा बसत नाही. दुसरीकडे, बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेह, रक्तदाब यासारखे असंसर्गजन्य आजारही वाढत आहेत. परंतु त्यासाठी आवश्यक तपासण्या आणि उपचार ग्रामीण भागात सहज उपलब्ध नाहीत. अशा पृष्ठभूमीवर 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अभियान निश्चितच स्वागतार्ह आहे. विशेषतः उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. स्वच्छता, पोषण, शुद्ध पाणी आणि आरोग्य जागरूकता या गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यास अनेक आजार टाळता येऊ शकतात. मात्र, केवळ जनजागृती करून चालणार नाही; त्यासाठी ठोस अंमलबजावणी आवश्यक आहे. या योजनेत गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत समित्या स्थापन करण्याची तरतूद आहे, तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना पुरस्कार देण्याची घोषणाही करण्यात आली आहे. पण यापूर्वीही अनेक योजना कागदावरच राहिल्या, हा अनुभव आहे. त्यामुळे यावेळी केवळ घोषणांवर न थांबता, प्रत्यक्ष कामावर भर देणे गरजेचे आहे. सरकारने जर खरोखरच ग्रामीण आरोग्य व्यवस्था सुधारायची असेल, तर डॉक्टरांची भरती आणि त्यांना दुर्गम भागात टिकवून ठेवण्यासाठी विशेष धोरण आखावे लागेल. टेलिमेडिसिनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहरातील तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा गावापर्यंत पोहोचवता येईल. तसेच, प्राथमिक आरोग्य केंद्रांना आवश्यक उपकरणे, औषधे आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' ही योजना केवळ सरकारी उपक्रम न राहता लोकचळवळ बनली, तरच तिचे खरे यश ठरेल. ग्रामपंचायत, स्थानिक संस्था आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग या योजनेला बळ देऊ शकतो. कारण आरोग्य ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाचीही आहे. यासोबतच, आरोग्यसेवेत पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करणेही तितकेच गरजेचे आहे. अनेक वेळा निधी मंजूर होतो, योजना आखल्या जातात, पण त्याची अंमलबजावणी कितपत होते, याचा ठोस आढावा घेतला जात नाही. जर प्रत्येक गावात आरोग्य सुविधांचा नियमित आढावा घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर उत्तरदायित्व निश्चित केले, तरच या मोहिमेचा खरा परिणाम दिसून येईल. अन्यथा निधी खर्च होईल, योजना पूर्ण झाल्याचे दाखवले जाईल, पण प्रत्यक्षात परिस्थिती तशीच राहण्याचा धोका कायम आहे. तसेच, ग्रामीण भागातील लोकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे ही देखील मोठी जबाबदारी आहे. अनेक वेळा अंधश्रद्धा, गैरसमज आणि पारंपरिक पद्धतींवर अवलंबून राहण्यामुळे लोक वेळेत उपचार घेत नाहीत. त्यामुळे सरकारी यंत्रणेसोबत स्वयंसेवी संस्था, आरोग्य कार्यकर्ते आणि स्थानिक नेत्यांनी एकत्रितपणे काम करून आरोग्य शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे. जेव्हा नागरिक स्वतः आपल्या आरोग्याबाबत सजग होतील, तेव्हाच आरोग्यसंपन्न गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरेल.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# भाजपाचा ४६ वर्षांचा गौरवशाली प्रवास

**श्यामकांत जहागीरदार**

भा जपाचा ४६ वा स्थापना दिन समारंभ ६ एप्रिलला देशभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भाजपाचा गेल्या ४६ वर्षांचा हा प्रवास मोठा लक्षवेधी, उल्लेखनीय आणि अतिशय अभिमानास्पद असा आहे. २०१४ पासून सलग तीन लोकसभा निवडणुका भाजपाने जिंकल्या आहेत, देशातील २१ राज्यांत आज भाजपाची वा भाजपा आघाडीची सरकारे आहेत. भारतीय जनता पक्ष हा देशातीलच नाही तर जगातील सर्वांत मोठा राजकीय पक्ष झाला आहे, देशातील सर्वांत श्रीमंत राजकीय पक्ष म्हणूनही भाजप ओळखला जातो. भाजपाची सुरुवात ही जनसंघापासून झाली आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय हे जनसंघाचे संस्थापक नेते होते. भाजपा कार्यालयातील बॅनरवर आजही डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पं. दीनदयाल उपाध्याय यांची छायाचित्रे आहेत. यावरून आपल्या मूळ पक्षाच्या संस्थापकांबद्दल भाजपला आजही अतिशय आदर असल्याचे तसेच त्यांच्याबद्दल तो कृतज्ञ असल्याचे दिसून येते. १९५१ मध्ये भारतीय जनसंघाची स्थापना झाली, १९७७ मध्ये तत्कालीन राजकीय गरज म्हणून जनसंघ जनता पक्षात विलीन करण्यात आला. मात्र नंतर वैचारिक मतभेदांमुळे जनता पक्षातून बाहेर पडत जुन्या जनसंघाच्या लोकांनी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. जनसंघापासून सुरू झालेला या पक्षाचा राजकीय प्रवास व्हाया जनता पक्ष भाजपपर्यंत पोहोचला आहे. हा प्रवास सोपा नव्हता, तर अतिशय कष्टाचा, संकटाचा आणि हालअपेष्टांचा होता.

१९८० मध्ये भाजपाच्या स्थापनेच्या वेळी पक्षाने गांधीवादी समाजवाद ही मुख्य विचारधारा स्वीकारली होती, त्यानंतर १९८५ मध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानववादाचा मार्ग भाजपाने पत्करला, जो आजपर्यंत कायम आहे. जनसंघाच्या वेळेला दिवा हे पक्षाचे निवडणूक चिन्ह होते, पण तेव्हा हा दिवा पूर्ण क्षमतेने कधी पेटलाच नाही आणि पेटला तर दीर्घकाळ टिकला नाही. मात्र भाजपाच्या स्थापनेनंतर पक्षाने कमळ हे निवडणूक चिन्ह घेतले, कमळ मात्र देशभर अतिशय जोमाने फुलले. कमळाचा उगम हा चिखलातून होत असतो, भाजपाचे कमळ हे असेच चिखलातून फुलले.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपाला २०१४ नंतर सोन्याचे दिवस आले, पण भाजपाच्या आजवरच्या राजकीय प्रवासात अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांचे योगदान अनन्यसाधारण म्हणावे लागेल. १९८० पासून २०१४ पर्यंत वाजपेयी आणि अडवाणी हे भाजपाचे देशभरातील लोकप्रिय चेहरा होते. भाजपाच्या या प्रवासात डॉ. मुरलीमनोहर जोशी, कुशाभाऊ ठाकरे, जन कृष्णमूर्ती, व्यंकय्या नायडू, राजनाथसिंह, नितीन गडकरी, अमित शाह, जे. पी. नड्डा यांचे योगदान तेवढेच महत्त्वाचे आहे. सध्या बिहारचे दमदार नितीन नवीन हे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे आणि भाजपाचे वय सारखेच आहे. दोघेही समवयीन आहेत. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला फक्त २ जागा मिळाल्या होत्या, ए. के. पटेल गुजरातमधून तर जंगा रेड्डी आंध्रप्रदेशच्या हनमकोंडामधून विजयी झाले होते. अटलबिहारी वाजपेयी आणि भाजपच्या अन्य सर्व प्रमुख नेत्यांचा तेव्हा पराभव झाला होता. त्यानंतर ४० वर्षांनी म्हणजे २०१४ मध्ये भाजपाने स्वळावर पहिल्यांदा स्पष्ट बहुमत मिळवले. अटलबिहारी वाजपेयी हे १९९६, १९९८ आणि १९९९ असे तीनदा देशाचे पंतप्रधान झाले, पहिल्यांदा ते १३ दिवसांसाठी, दुसऱ्यांदा १३ महिन्यांसाठी तर तिसऱ्यांदा पाच वर्षांसाठी पंतप्रधान होते. पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे वाजपेयी दे देशातील पहिले गैरकाँग्रेसी पंतप्रधान होते. नरेंद्र मोदी यांनी २०२४ मध्ये तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. आतापर्यंत दोन वेळा त्यांनी पंतप्रधान म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. पंतप्रधान म्हणून पाच वर्षांचा तिसरा कार्यकाळही ते पूर्ण करतील, असा देशातील लोकांचा विश्वास आहे.

देशातील २१ राज्यांत आज भाजपाची आणि भाजपा आघाडीची सरकारे आहेत. देशात सर्वाधिक म्हणजे ३१ वर्षांपासून गुजरातमध्ये भाजपाचे सरकार आहे. केशुभाई पटेल हे गुजरातमधील भाजपाचे पहिले मुख्यमंत्री होते. सुरेश मेहता, शंकरसिंह वाघेला आणि दिलीप पारेख हे भाजपाचे नंतरचे मुख्यमंत्री होते. १९९८ मध्ये केशुभाई पटेल दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. २००१ मध्ये नरेंद्र मोदी पहिल्यांदा गुजरातचे मुख्यमंत्री झाले, त्यानंतर सलग चारवेळा त्यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. काही दिवसांपूर्वी मोदी यांनी सरकारप्रमुख म्हणून सर्वाधिक काळ सत्तेवर राहण्याचा अरुणाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री पवनकुमार चामलिंग यांचा ८९३० दिवसांचा विक्रम मोडला.

गुजरातनंतर मध्यप्रदेशात मधला काही अपवाद वगळता भाजपा २००३ पासून २० वर्षांपेक्षा जास्त काळापासून सत्तेत आहे. हरयाणातही भाजपाने सत्तेवर येण्याची हॅट्‌ट्रिक केली आहे. २०२७ मध्ये भाजपा उत्तरप्रदेशातही योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वात सत्तेवर येण्याची हॅट्‌ट्रिक करेल, यात शंका नाही. गोवा, दिल्ली, त्रिपुरा, आसाम, ओडिशा, हरयाणा, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड या राज्यांत भाजपाचे मुख्यमंत्री आहेत. बिहार, सिक्कीम, मेघालय, नागालॅण्ड. मिझोराम, मणिपूर, आंध्रप्रदेश आणि अरुणाल प्रदेश या राज्यांत भाजपाच्या मित्रपक्षांचे मुख्यमंत्री आहेत. बिहारमध्ये आता भाजपाचा मुख्यमंत्री शपथ घेण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे २४० सदस्य निवडून आले होते. २०१९ मध्ये भाजपाचे ३०३ तर २०१४ मध्ये २८२ खासदार निवडून आले होते. रालोआतील मित्रपक्ष मिळून सध्या लोकसभेत भाजपाचे संख्याबळ २९५ आहे. राज्यसभेतही भाजपाने खासदारांचे शतक पूर्ण केले असून तेथे १०३ खासदार आहेत. रालोआतील मित्रपक्ष पकडून भाजपा खासदारांची संख्या १३३ वर जाते. देशभरातील सर्व राज्य विधानसभांतील आमदारांची संख्या ४०३३ आहे, यात भाजपाचे सर्वाधिक म्हणजे १६५४ आमदार आहेत. २०१४ मध्ये देशभरातील भाजपा आमदारांची संख्या १०३५ होती, २०२५ मध्ये १६५४ झाली. २०१४ नंतर २०१५ चा अपवाद वगळता देभरातील भाजपा आमदारांच्या संख्येत दरवर्षी वाढच झाली आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका आटोपल्यावर ही संख्या आणखी वाढेल, यात शंका नाही. देशातील सर्वांत वयस्कर पक्ष असलेली काँग्रेस शेवटचे आचके देत असताना ४६ वर्षांच्या तरुण भाजपाचा हा प्रवास नेत्रदीपक आणि सर्वांच्या दृष्टीने अभिमानास्पद असाच म्हणावा लागेल.

९८८१७१७८१७

### सुंभ जळाला तरी काँग्रेसचा पीळ जाईना!

राजकारणात वैचारिक मतभेद असणे स्वाभाविक आहे, परंतु सध्याच्या काळात काँग्रेस पक्षाच्या नेत्यांकडून ज्या प्रकारे वैयक्तिक आणि खालच्या पातळीवर जाऊन टीका केली जात आहे, त्यावरून विनाशकाले विपरीत बुद्धी या म्हणीची प्रचीती येत आहे. काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेडा यांचे ताजे उदाहरण या राजकीय घसरणीचा पुरावाच आहे.





आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांच्या पत्नीवर पवन खेडा यांनी केलेले आरोप ज्यामध्ये यूएई, एन्टिग्वा आणि बार्बुडा अशा तीन देशांचे पासपोर्ट असल्याचा दावा करण्यात आला होता, हे पूर्णपणे बिनबुडाचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. विधानसभा निवडणुकीच्या काळात केवळ मुख्यमंत्र्यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी अशा प्रकारची विधाने करणे ही काँग्रेसची जुनी खोड झाली आहे. मात्र, सरमा यांनी या आरोपांना चोख प्रत्युत्तर देत मानहानीचा गुन्हा दाखल केल्यामुळे आता काँग्रेसची चांगलीच भंबेरी उडाली आहे. मी अटकेला घाबरत नाही अशी मोठी विधाने करणाऱ्या पवन खेडा यांची खरी परीक्षा जेव्हा आली, तेव्हा ते चौकशीला सामोरे जाण्याऐवजी पळ काढताना दिसले. आसाम पोलिस जेव्हा दिल्लीत त्यांच्या घरी पोहोचले, तेव्हा ते काँग्रेसशासित तेलंगणा राज्यात आश्रयाला गेल्याचे समजले. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वडिलांबाबत अपमानास्पद विधान करतानाही त्यांनी अटकेच्या भीतीने आधीच वकिलांची फौज न्यायालयात उभी केली होती. यावरून हे स्पष्ट होते की, काँग्रेस नेत्यांकडे केवळ गरळ ओकण्याचे धाडस आहे, पण परिणामांना सामोरे जाण्याची हिंमत नाही. आज काँग्रेस पक्षाची अवस्था अत्यंत दयनीय आहे. अशा वेळी संघटनेला बळकटी देण्याऐवजी राहुल गांधींपासून ते प्रवक्त्यांपर्यंत सर्वजण केवळ वादात राहण्यासाठी विधाने करण्यात मश्गूल आहेत. हेमंत बिस्वा सरमा यांनी ज्या आक्रमकतेने कायदेशीर कारवाई केली आहे, त्याने काँग्रेस नेत्यांची बोलती बंद झाली आहे. मराठीत एक म्हण आहे, "सुंभ जळाला तरी पीळ जात नाही." काँग्रेसच्या बाबतीत नेमके हेच घडताना दिसत आहे.

**अविनाश देशपांडे**/पुणे ९४२२९५०७५०

## वाचक पत्रे

### पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे हिमनद्या धोक्यात

हिमालयीन क्षेत्रातील हिमनद्या अत्यंत वेगाने वितळत असून २००० पासून बर्फ वितळण्याचा वेग दुप्पट झाला आहे. १९९० ते २०२० या काळात हिमालय पर्वतातील हिमनद्यांनी आपल्या क्षेत्राचा बारा टक्के भाग गमावल्याची धक्कादायक माहिती अलिकडेच एका आंतरराष्ट्रीय अहवालातून स्पष्ट झाली आहे. अलिकडेच नेपाळची राजधानी काठमांडू येथे जागतिक हिमनदी दिनाचे औचित्य साधून हिमनदी वितळण्याच्या वाढत्या धोक्याचा इशारा देणारे हे अहवाल प्रकाशित करण्यात आले. यातील प्रमुख अहवालानुसार १९७५ पासून आतापर्यंत हिमनद्यांच्या बर्फाची जाडी २७ मीटरपर्यंत कमी झाली असे म्हटले गेले. वेगाने बदलणाऱ्या बर्फाच्छादित प्रदेशाचे परिणाम कमी करण्यासाठी हिमनद्यांच्या निरीक्षणात मोठी वाढ करणे याशिवाय इतर उपायांची चर्चा केली गेली. हिमनद्या वितळण्याचा धोका केवळ भारतालाच नसून हिमालयाच्या कुशीत वसलेल्या नेपाळ, भूतान यासारख्या देशांनाही आहे. त्याचबरोबर पाकिस्तान, बांगलादेश यांच्यामध्ये हिमनद्यांचे पाणी वाहत जाते. त्यांनाही संभाव्य धोका असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्र या नद्यांच्या खोऱ्यांमधील हिमनद्या सर्वाधिक असुरक्षित असल्याचे स्पष्ट होत आहे. या नद्यांवरील संकट संपूर्ण आशिया खंडासाठी मोठे संकट ठरू शकते, असा इशाराही या अहवालांमध्ये देण्यात आला आहे. या नद्या कोट्यवधी लोकांच्या अन्न, पाणी, ऊर्जा आणि उपजीविकेचा आधार आहेत. आशियातील किमान दहा प्रमुख नद्यांचे उगमस्थान हिमालयातच आहे. वाढत्या पर्यावरण ऱ्हासाचा हिमनद्यांवर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळेच नैसर्गिक संकटांच्या मालिका या भागातील जनतेवर ओढवत आहेत. त्यातून जीवित आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. त्यामुळेच हवामान अनुकूल नियोजनासाठी मोठी गुंतवणूक करणेदेखील आता काळाची गरज आहे.



**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



**केज / प्रतिनिधी |** केज तालुक्यातील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी संतोष देशमुख यांनी सरपंच पदासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

# केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचे कार अपघातात दुर्दैवी निधन

## कार्यक्षम, मनमिळाऊ आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तत्परतेने काम करणारा अधिकारी हरपला

तभा. वृत्तसेवा

**केज |** प्रतिनिधी

केज तालुक्याचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचे आज सकाळी लातूर-अंबाजोगाई महामार्गावरील रेणापूर फाट्याजवळ झालेल्या भीषण कार अपघातात दुर्दैवी निधन झाले. स्वतःच्या कारने प्रवास करत असताना त्यांच्या वाहनाचा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, कारमध्ये ते एकटेच होते. गाडी वेगात असताना अचानक नियंत्रण सुटून वाहन पलटी झाल्याने हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज रेणापूर पोलिसांनी व्यक्त केला आहे. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की त्यांचा जागीच मृत्यू झाला.







घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे. राकेश गिड्डे हे केवळ प्रशासकीय अधिकारी नसून कामात तत्पर, मनमिळाऊ आणि जनतेच्या प्रश्नांप्रती संवेदनशील अधिकारी म्हणून ओळखले जात होते. विशेषतः शेतकऱ्यांच्या वादांमुळे बंद असलेले तालुक्यातील अनेक रस्ते त्यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून मोकळे करुन दिले होते. सामान्य नागरिकांच्या अडचणी तत्परतेने सोडविणारा अधिकारी म्हणून त्यांनी अल्पावधीतच जनमानसात वेगळी ओळख निर्माण केली होती.

एका कार्यक्षम, तरुण आणि लोकाभिमुख अधिकाऱ्याच्या अशा अकाली जाण्याने महसूल प्रशासनासह संपूर्ण केज तालुक्यावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## बीड नगर परिषदेत कंत्राटी कामगारांसाठी किमान वेतन आणि विमा संरक्षणाची मंजुरी

तभा वृत्तसेवा

**बीड |** कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार पगार थेट बँक खात्यात देण्यास तसेच त्यांना विमा संरक्षण देण्यास मागणी केली. या मागणीची दखल घेत नगराध्यक्ष, उपाध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांनी शासनाने घालून दिलेल्या किमान वेतन कायद्याप्रमाणे पुढील काळात कंत्राटी कामगारांना वेतन देण्याचा ठराव स्थायी समितीत पारित केला.

स्थायी समितीच्या बैठकीत स्वच्छता व पाणीपुरवठा विभागातील लेबर टेंडर प्रक्रियेला मंजुरी देताना आ. विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली अमर नाईकवाडे यांनी कंत्राटी कामगारांचा मुद्दा उपस्थित केला. नगर परिषदेत कार्यरत कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये महत्त्वपूर्ण सेवा बजावत असून त्यांचे वेतन अपुरे असल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली.

कंत्राटी कामगारांना किमान वेतन मिळणे हा त्यांचा कायदेशीर हक्क असून वेतन थेट बँक खात्यात जमा करावे, तसेच स्वच्छता व पाणीपुरवठा विभागातील जोखमींमुळे सर्व कंत्राटी कामगारांचा विमा उतरवावा, असेही त्यांनी ठामपणे मागणी केली.

या निर्णयामुळे बीड नगर परिषदेत कार्यरत कंत्राटी कामगारांना मोठा दिलासा मिळणार असून त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेत वाढ होईल. किमान वेतन मिळाल्यास कामगारांच्या जीवनमानात सुधारणा होऊन कामकाजात अधिक स्थैर्य निर्माण होईल, असा विश्वास अमर नाईकवाडे यांनी व्यक्त केला.

## जरुड येथे भैरवनाथ यात्रा उत्सवात कुसत्याचा कार्यक्रम

तभा. वृत्तसेवा

**बीड प्रतिनिधी |** बीड तालुक्यातील जरुड येथे पृतीवषापृमाने याही वर्षी श्री क्षेत्र भैरवनाथ मंदिर जरुड येथे यात्रा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन दि १०एपिल शुक्रवारी छबिना व पालखिची भव्य वाजत गाजत मिरवणूक निघेल दि ११ रोजी शनिवारी भैरवनाथाच्या मुर्तीची रथातून ढोलताशांच्या गजरात गुलालाची व रेवडयाची उधळण करीत मिरवणूक काढण्यात येणार आहे दि १२ एप्रिल रविवारी भैरवनाथ महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त भव्य कुसतयाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे कुस्ती विजेतयास



योग्य पृकारचे बक्षीस देण्यात येणार आहे तरी या भैरवनाथ देवस्थान यात्रा उत्सवाचा भाविक भक्तांनी व कुस्ती शोकिनानी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे जरुड गावकर यांच्या वतीने आव्हान करण्यात येत आहे

## वृद्धाचा विहिरीत आढळला मृतदेह





तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** तालुक्यातील सातेफळ येथील वाघाळवाडी व सातेफळ खसाड शिवारात एका ७० वर्षीय वयोवृद्धाचा मृतदेह विहिरीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. छत्रभुज मोरे असे मृत वृद्धाचे नाव असून, ते गेल्या तीन दिवसांपासून बेपत्ता होते.

छत्रभुज हरिश्चंद्र मोरे (वय ७०), रा. मोरेवाडी, ता. अंबाजोगाई यांची सातेफळ शिवारात ६ ते ७ एकर जमीन आहे. १० वर्षांपूर्वी त्यांनी मोरेवाडी येथील काही जमीन विकून सातेफळ शिवारात ही जमीन खरेदी केली होती. तेव्हापासून ते आपल्या पत्नीसह शेतातच वास्तव्यास होते. त्यांचे दोन विवाहित मुले मोरेवाडी शिवारातील अडीच एकर शेती सांभाळतात. गेल्या तीन दिवसांपासून मोरे बेपत्ता होते, ज्याचा शोध घेतला जात होता. बुधवारी (दि. ८) रोजी सातेफळ शिवारातील सूर्यवंशी श्रीरंग (दि.८) रोजी सातेफळ शिवारातील सूर्यवंशी श्रीरंग यांच्या विहिरीत एक मृतदेह तरंगताना आढळून आला. हा मृतदेह छत्रभुज मोरे यांचा असल्याची खात्री पटली आहे. दारूच्या नशेत असताना त्यांचा पाय घसरून ते विहिरीत पडले असावेत, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह विहिरीबाहेर काढून पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या घटनेबाबत अंबाजोगाई ग्रामीण पोलीस अधिक तपास करत आहेत.

# रामगडावर दर्शनासाठी आलेल्या महिलेचे दागिने चोरणारी महिला जेरबंद

तभा. वृत्तसेवा

**बीड |** रामगड येथे दर्शनासाठी गेलेल्या सोनाबाई रतन वैद्य या वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने गर्दीत लंपास केले होते. याप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. तांत्रिक माहिती आणि गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार, हा गुन्हा गांधीनगर पेठ परिसरातील दुर्पदाबाई परमेश्वर जाधव या महिलेने केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून संबंधित महिलेला ताब्यात घेतले असता तिच्याकडे चोरीचे दागिने आढळून आले.



रामगडावर चोरी करणाऱ्या महिला आरोपीला बीड स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या रामगड येथे दर्शनासाठी आलेल्या ७५ वर्षीय वृद्ध महिलेचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या दुर्पदाबाई जाधव या महिलेला बीड स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. आरोपीकडून १,७०,००० रुपये किमतीचे दागिने जप्त करण्यात आले असून ही कारवाई गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी महिलेकडून सुमारे पावणे दोन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि अंमलदारांच्या पथकाने यशस्वीरीत्या पूर्ण केली. पकडलेल्या महिला आरोपीला पुढील तपासासाठी बीड ग्रामीण पोलिसांच्या हवाली करण्यात आले असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## बीड जिल्हा पोलीस दलातील रिक्त १७४ पोलीस शिपाई पदांची भरती लवकरच पूर्ण होणार

तभा वृत्तसेवा

**बीड |** बीड जिल्हा पोलीस दलातील रिक्त असलेल्या १७४ पोलीस शिपाई पदांच्या भरतीची प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. मैदानी आणि लेखी अशा दोन्ही स्तरांवर पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. ही प्रक्रिया काही दिवसांत पूर्ण होऊन, पुढील काही दिवसांत उमेदवारांच्या हाती नियुक्तीपत्रे दिली जाणार आहेत.

बीड जिल्हा पोलीस प्रशासनाकडून राबविलेल्या या भरती प्रक्रियेसाठी जिल्ह्यातून ८ हजारांहून अधिक तरुणांनी अर्ज केले, त्यापैकी ५ हजार तरुण शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरले. त्यातील १९०० उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात आली होती.

मैदानी आणि लेखी अशा दोन्ही स्तरांवर ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने पार पडली. आता फक्त तांत्रिक बाबींची पूर्तता बाकी आहे. सध्या निवडसूचीतील उमेदवारांच्या शैक्षणिक दाखल्यांसह जात प्रमाणपत्र, चारित्र्य पडताळणी आणि इतर आवश्यक तांत्रिक कागदपत्रांची बारकाईने तपासणी केली जात आहे.

ही पडताळणी पूर्ण होताच पात्र उमेदवारांना पोलीस दलात सेवेची संधी मिळणार आहे, ज्यामुळे जिल्ह्यातील सुरक्षादलासाठी आवश्यक भरती लवकरच होईल.

## मुख्यमंत्री गुरुवारी म्हसोबाची वाडीत सप्ताह सांगतेला येणार; प्रशासनाची तयारी सुरू

तभा वृत्तसेवा

**बीड |** म्हसोबाची वाडी येथील नारळी सप्ताहाची गुरुवारी सांगता होत असून, या सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्यासह अनेक मंत्री व खासदार, आमदार उपस्थित राहणार आहेत. यानुषंगाने सप्ताह कमिटीसह प्रशासनाकडून तयारीचे काम सुरू आहे. संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभकेलेला पारंपरिक श्री गहिनीनाथ गडाचा नारळी सप्ताह बीड अहिल्यानगर राज्य महामार्गावरील आष्टी तालुक्यातील म्हसोबाची वाडी येथे येथे सुरू आहे. गुरुवार, ९ एप्रिल रोजी सकाळी सप्ताहाची सांगता होणार आहे येथील नारळी सप्ताहास राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह अनेक मान्यवर येणार आहेत. तसेच बीड, अहिल्यानगर जिल्ह्यातील जवळपास एक ते दीड लाख भाविक भक्त येणार असल्याने अंभोरा पोलिसांकडून तगडा बंदोबस्त लावण्याचे नियोजन सुरू आहे. पोलिस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक, उपअधीक्षक, पोलिस निरीक्षक असे ५० अधिकारी, २५० पोलिस कर्मचारी आणि काही स्वयंसेवक असा बंदोबस्त राहणार आहे.

## महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील ७० किलो वजन गटात सुमितकुमार भारस्करने पटकावले सुवर्णपदक

तभा वृत्तसेवा

**बीड, ०८ एप्रिल |** शेलापुरी येथील सुमितकुमार ऊसतोड कामगाराचा मुलगा पहिलवान आप्पासाहेब भारस्कर याने महाराष्ट्र केसरी स्पर्धेत ७० किलो वजन गटातील गादी विभागात सुवर्णपदक पटकावले आहे. पुण्याच्या वाघोली येथे महाराष्ट्र केसरी अधिवेशन पार पडले असून, यावेळी पहिलवान सुमितकुमार भारस्कर अशा मोठ्या गुण फरकाने विजय मिळवत सेमी फायनलमध्ये पुणे शहरचा विपुल थोरात सोबत ०८-०५ अशी लढत करून अंतिम फेरीत पोहचला.

# धारूर पोलिसांची मोठी कारवाई; जबरी चोरीचा गुन्हा अवघ्या दीड तासात उघड!

## पोलीस निरीक्षक वाघमोडे यांच्या टीमची तत्परता; मुद्देमालासह दोन आरोपींना बेड्या

तभा. वृत्तसेवा

**किल्ले धारूर (प्रतिनिधी) |** धारूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेला जबरी चोरीचा खळबळजनक गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना अवघ्या दीड तासात यश आले आहे. पोलीस निरीक्षक वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखालील टीमने अत्यंत वेगाने चक्रे फिरवत दोन सराईत आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली शस्त्रे जप्त केली आहेत.

धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३०/२०२६, कलम ३०९(४), (६) BNS नुसार जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक वाघमोडे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ तपासाची पथके रवाना केली. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी अवघ्या दीड तासाच्या आत आरोपींच्या मुसक्या आवळल्या.



अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मनोज ऊर्फ सोन्या चंद्रकांत घोळवे (वय १९, रा. आंबे वडगाव) आणि सुमित प्रमोद कंगने (वय १९, रा. धूनकवाड, ता. धारूर) यांचा समावेश आहे. आरोपींकडून ६८,०३० रुपये किमतीचे विविध रंगांचे डब्बे (मु मुद्देमाल) मेमोरंडम पंचनाम्यानुसार हस्तगत करण्यात आला आहे. तसेच गुन्ह्यात वापरलेली मारुती ८०० कार, एअर गन, चाकू, कोयता आणि मास्क असा मुद्देमालही पोलिसांनी जप्त केला आहे.

पोलीस निरीक्षक वाघमोडे हे त्यांच्या कर्तव्यदक्षतेसाठी आणि गुन्हेगारांवर असलेल्या वटपेसाठी ओळखले जातात. केवळ पोलीस दलातच नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही त्यांचा दांडगा जनसंपर्क असून एक जनसामान्यांशी नाळ असलेला अधिकारी म्हणून त्यांची ख्याती आहे. या गुन्ह्याचा तपास ज्या वेगाने लावला, त्यावरून त्यांच्या टीमच्या कार्यक्षमतेवर शिक्कामोर्तब झाले आहे.

या गुन्ह्यातील उर्वरित आरोपींचा शोध पोलीस घेत असून, अटक केलेल्या आरोपींची पोलीस कोठडी (PCR) घेण्यात येणार आहे. या आरोपींकडून परिसरात घडलेले आणखी काही गंभीर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

धारूर पोलिसांनी केलेल्या या धडाकेबाज कारवाईमुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असून, पोलीस निरीक्षक वाघमोडे व त्यांच्या संपूर्ण टीमवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## आर्धी घोंगडी.... कुटुंब व्यवस्थेवर गोदींकर महाराजांचे अंजन....

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी) |** एका कुटुंबात सुनेकडून सासू - सासरे यांची नीट देखभाल होत नसे, एके दिवशी वैतागून म्हातारे सासू सासरे यांना घराबाहेर काढले गेले, बाहेर थंडीत पांघरूणासाठी त्यांनी मागणी आपल्या मुलाकडे केली, मुलांनी नातवाला सांगितले बाळा आजोबासाठी वरच्या खोलीतील घोंगडी घेऊन ये, बाळाने आणली, पाहिली तर ती अर्धीच होती, विचारणा केली तेव्हा त्याने सांगितले बाबा तुम्ही पण काही दिवसांनी असेच म्हातारे झाल्यावर तुम्हाला थंडी वाजेल, तेव्हा देता येईल म्हणून ठेवली आणि आर्धि करून आणली.....

लहान मुलं वडीलधाऱ्यांचे अनुकरण करतात, कुटुंबात आचरण चांगलं असेल तर पिढी चांगली घडते, अत्यंत महत्त्वपूर्ण विषय,बिघडत असलेली कुटुंब व्यवस्था यावर भागवताचार्य ह भ प विश्वंभर मुळे गोंदीकर महाराजांनी आज अंजन घातले .

धर्म म्हणजे काय? सनातन हिंदु धर्म या विषयी गोंदीकर महाराजांनी सोप्या भाषेत महत्त्व पटवून दिले, आपले परमोच्च कर्तव्य म्हणजेच धर्म. स्त्रीने आपले घर आदर्श ठेवावे हा तिचा धर्म. हिंदू धर्म म्हणजे या पुण्यभूमीला जो पितृभूमी मानतो तो हिंदू , ज्या या धर्माची वाटचाल वेदांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे पण याची सुरुवात सांगता येत नाही असा हा सनातन धर्म, आपल्याला उन्नत विचार देतो, ईश्वरांची वेगवेगळी रूपात पूजा करता येते, कोणतेही बंधन नाही, कोणतेही शक्ती नाही. मानव असणं म्हणजे हिंदू धर्मपालन ,स्त्री पुरुष देवता स्वरूप अशी सर्व मुभा देणारा धर्म स्वातंत्र्य सांगतो पण त्याचा स्वैराचार होऊ नये... धर्मावरील विश्वास, त्याचे रक्षण आणि पालन केले पाहिजे. प्रत्येकाने आपल्या घरातून ते केले पाहिजे. पूर्वीच्या काळी जसे द्रष्टे ऋषीमुनी भविष्याची चिंता करून लोककल्याणासाठीचे मार्गदर्शन करत असत, तसेच पुढच्या शंभर वर्षाचे चिंतन वर्तमानात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वस्तीपर्यंत जाऊन अशा हिंदू समेलनातून मांडत आहे. कुटुंबाच्या प्रबोधना पासून जे पंचतत्व कर्तव्य पालन करण्याचे संघ सांगतो आहे, त्याचे अनुकरण प्रत्येक कुटुंबात झाले पाहिजे.

# धारुर तालुक्यात काँग्रेसच्या 'संघटन सृजन' अभियानाचा एल्गार; तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रंदवे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा अभूतपूर्व उत्साह

तभा. वृत्तसेवा

**किल्ले धारूर |** प्रतिनिधी

अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या निर्देशानुसार पक्ष संघटना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये नवी ऊर्जा फुंकण्यासाठी 'संघटन सृजन अभियान' राबवण्यात येत आहे. याच अभियानाचा भाग म्हणून धारूर तालुका काँग्रेस समितीची अत्यंत महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक बैठक ७ एप्रिल रोजी केज रोडवरील हॉटेल राहुल येथे उत्साहात पार पडली. या बैठकीला कार्यकर्त्यांचा मिळालेला उदंड प्रतिसाद पाहता, आगामी काळात तालुक्यात काँग्रेस पक्ष अधिक आक्रमकपणे कार्य करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि यशस्वी अंमलबजावणीमध्ये तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रंदवे यांनी मोलाची भूमिका बजावली. पक्षाची ध्येयधोरणे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी रंदवे यांनी केलेल्या सूक्ष्म नियोजनामुळेच बैठकीला ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले. "प्रत्येक बुथवर सक्षम कार्यकर्ता" हे उद्दिष्ट समोर ठेवून त्यांनी कार्यकर्त्यांशी



संवाद साधला. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच धारूर तालुक्यात संघटनेला एक नवी दिशा आणि बळकटी मिळत असल्याचे चित्र या बैठकीदरम्यान पाहायला मिळाले.

कार्यक्रमासाठी निरीक्षक म्हणून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या नीतू वर्मा यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून पक्षवाढीसाठी त्यांच्या सूचना जाणून घेतल्या. तसेच संघटन निरीक्षक सुरेंद्र गोडजकर, प्रदेश समन्वयक विद्याताई पाटील आणि जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण शेप यांनीही पक्ष बांधणीवर मार्गदर्शन केले.

जिल्हा आणि तालुका स्तरावरील रिक्त पदांच्या निवडीबाबत सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरुद्ध जनतेमध्ये जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला.

धारूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे आणि सामान्य जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यावर चर्चा झाली.

या बैठकीची सुरुवात प्रशांत शिनगारे यांनी प्रास्ताविकातून केली. यावेळी बाळासाहेब ठोंबरे, सुबराव सोळंके, महादेव सातपुते, राधाकिसन गवळी, उत्तमराव ढगे, अशोक तिडके, संतोष सावंत, अतुल फुग्रे, जनक फुग्रे, अण्णा गौणे, साथिंदर निक्ते, लोखंडे, शेख शाहनवाज यांसह तालुक्यातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रंदवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतलेले विशेष परिश्रम घेतले

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सप्ताहाला उत्साहात सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ एप्रिल**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त हिंगोली जिल्ह्यात उद्या गुरुवार ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचा प्रसार आणि महामानवांच्या विचारांचा जागर केला जाणार आहे.
प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले आणि छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे उद्धाटन आज करण्यात आले. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष असल्याने ९ एप्रिल रोजी हिंगोली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालय, आश्रमशाळा, शासकीय वसतिगृह, निवासी शाळा येथे मानवी हक्कांवर आधारित व्याख्याने, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे. यासोबतच संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. १० एप्रिल रोजी समतादूतांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात पथनाट्यांद्वारे शासकीय योजनांविषयी जनजागृती केली जाईल. तसेच 'मार्जिन मनी' योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सहायक आयुक्त श्रीमती गुठ्ठे यांनी सांगितले.
महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे हे द्विशताब्दी वर्ष असल्याने त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रमांचे शासकीय वसतिगृहे व निवासी शाळांमध्ये ११ एप्रिल रोजी आयोजन करण्यात येईल. १२ एप्रिल रोजी 'संविधान जागर' अंतर्गत संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्यांविषयी विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. तसेच महिला मेळाव्याच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याचा माहिती दिली जाईल. १३ एप्रिल रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबीर व मेळावा आयोजित करण्यात येईल. तसेच जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे श्रीमती गुठ्ठे म्हणाल्या.
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी अभिवादन कार्यक्रम, चर्चासत्रे आणि कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान मेळावा आयोजित करून शेतकऱ्यांसाठी बाबासाहेबांनी केलेल्या कार्याची माहिती दिली जाईल. या सप्ताहादरम्यान विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिक, विद्यार्थी आणि लाभार्थ्यांनी या विविध उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त श्रीमती गीता गुठ्ठे यांनी केले.

# कायद्याचे पालन करून डीजे मुक्त डॉ. आंबेडकर जयंती साजरी करा

## जिल्हाधिकाऱ्यांचे शांतता समितीत आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ एप्रिल**
आगामी होणारी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती ही नियम पाळून शांततेत साजरी करावी. तसेच जीवितास हानिकारक डीजे चा वापर न करता पारंपारिक वाद्य, व्याख्यानमाला, समाज उपयोगी कार्यक्रम घेऊन साजरी करावी.
यापूर्वी विविध धार्मिक कार्यक्रमात यांनी वेग मर्यादा ओलांडूनडीजे वाजविले आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल करून कठोर कार्यवाही करण्यात आलेली आहे त्यामुळे यानंतर सुद्धा हिंगोली जिल्ह्यात जो कोणी नियम तोडून डीजे चा वापर करेल त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येणार आहे, त्यामुळे कुणीही कायदा मोडू नये तसेच कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करू नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ही अगदी आनंदात उत्साहात व नियम पाळून साजरी करावी. हिंगोली पोलीस दलातर्फे पूर्ण जिल्ह्यात परिपूर्ण पोलीस बंदोबस्त लावण्यात आला असून
कोणत्याही मदतीसाठी हिंगोली पोलीस दल २४ तास सज्ज असल्याचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी सांगितले.
सदर शांतता समिती मीटिंग दरम्यान जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलीस अधीक्षक डॉ नीलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, सहाय्यक जिल्हाधिकारी योगेशकुमार मीना, तसेच जिल्ह्यातील शांतता कमिटी सभासद मुधकर मांजरमकर, शेख नईम शेख लाल, दिलीप चव्हाण, रवींद्र वाऐ, मितींद उबाळे आदींसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी पोलीस पाटील यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.
नागरिकांनी काही प्रशासनात सूचना दिल्या असून त्या त्वरित सोडवण्याचे सुद्धा प्रशासनाच्या वतीने आश्वासन देण्यात आले.

# जिल्हा रूग्णालयातील वॉटर फिल्टर तीन महिन्यांपासून बंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ एप्रिल**
येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना सध्या भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. रुग्णालयातील वॉटर फिल्टर गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून बंद अवस्थेत असल्याने, शुद्ध पाण्याऐवजी रुग्णांना मिळेल त्या पाण्यावर तहान भागवावी लागत आहे. याकडे जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.
जिल्हा रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण उपचारासाठी येतात. उन्हाळ्याची चाहूल लागलेली असताना पिण्याच्या पाण्याची सोय असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, रुग्णालयातील शुद्ध पाणी देणारे फिल्टर यंत्र गेल्या अनेक दिवसांपासून नादुरुस्त आहे. वारंवार तक्रार करूनही हे यंत्र दुरुस्त करण्यात आलेले नाही. रुग्णालयातील फिल्टर बंद असल्यामुळे गरिब रुग्णांच्या नातेवाईकांना बाहेरून पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. जे नातेवाईक पाणी विकत घेऊ शकत नाहीत, त्यांना अशुद्ध पाणी पिण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. यामुळे रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे. रुग्णालयाची स्वच्छता आणि सोयीसुविधांबाबत मोठे दावे केले जातात, मात्र साधे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया रुग्णांच्या नातेवाईकांनी दिली आहे. दोन ते तीन महिन्यांपासून रखडलेला हा प्रश्न मार्गी लावून, प्रशासनाने तातडीने वॉटर फिल्टर दुरुस्त करावा आणि रुग्णांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवावी, अशी मागणी आता सर्वसामान्य नागरिकांमधून केली जात आहे.



**हिंगोली– जायकवाडी धरणातील पाणी वाटप, सिंचन नियोजन व भविष्यातील जलसुरक्षेच्या दृष्टीने कालवा सल्लागार समितीची बैठक पैठण येथे पार पडली. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार रामराव वडकुते, खा कल्याण काळे, राज्यमंत्री मेधना बोर्डीकर आदींची उपस्थिती होती.**

# वन डे वन साईड बंदमुळे शहरात वाहतुक कोंडी



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ९ एप्रिल**
शहरातील प्रमुख मार्गांवर पुन्हा एकदा वाहतूक कोंडीचा भीषण उद्रेक झाला असून, पोलीस स्टेशन ते झेंडा चौक, झेंडा चौक ते मामा चौक आणि पुढे महावीर चौक हा संपूर्ण पट्टा अक्षरशः ठप्प झाला आहे.
वाहनांच्या लांबच लांब रांगा, बेकायदेशीर पार्किंग आणि रस्त्यांवर उभ्या-आडव्या लावलेल्या दुचाकी-चारचाकी वाहनांमुळे नागरिकांना चालणेही कठीण झाले आहे. काही ठिकाणी तर रुग्णवाहिकांनाही मार्ग काढणे अवघड जात असल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे.
शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेत दिवसेंदिवस वाढत चाललेल्या गर्दीमुळे वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. विशेषतः झेंडा चौक, मामा चौक आणि महावीर चौक परिसरात कोणतीही शिस्त दिसून येत नसल्याने नागरिकांचा रोष वाढत आहे. शाळा, बँका, शासकीय कार्यालये आणि व्यापारी प्रतिष्ठान या सर्वांचा केंद्रबिंदू असलेल्या या मार्गांवर वाहतुकीची कोंडी ही आता दैनंदिन डोकेदुखी बनली आहे.
दरम्यान, माजी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी राबविलेली वन डे-वन साईड (एक दिवस एक बाजू पार्किंग) ही योजना एकेकाळी या समस्येवर प्रभावी उपाय ठरली होती. या योजनेअंतर्गत काटेकोर अंमलबजावणीमुळे वाहनांची योग्य पार्किंग व्यवस्था झाली होती आणि वाहतूक सुरळीत राहिली होती. नागरिकांनीही या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला होता. मात्र त्यांच्या बदलीनंतर ही योजना पूर्णपणे थंड बस्त्यात गेल्याचे दिसून येत आहे.
सध्या कोणतीही पर्यायी व्यवस्था नसल्याने परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. दुकानदारांकडून रस्त्यावरच वाहनं उभी केली जात असल्याने रस्त्यांची रुंदी आणखी कमी होत आहे. त्यातच फेरीवाले, हातगाड्या आणि अनधिकृत स्टॉल्स यामुळे पादचारी मार्गही अडथळ्यांनी भरले आहेत. परिणामी, पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना मोठा धोका निर्माण झाला आहे.लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात नागरिक खरेदीसाठी शहरात येत आहेत. मात्र वाहतूक कोंडीमुळे त्यांचा वेळ वाया जात असून, बाजारपेठेतील व्यवहारांवरही परिणाम होत आहे. अनेक ग्राहक कोंडीमुळे परत जात असल्याची तक्रार व्यापाऱ्यांकडूनही व्यक्त केली जात आहे.
यासोबतच, वाहतूक नियमनासाठी आवश्यक असलेली पोलीस यंत्रणा अनेक ठिकाणी अपुरी पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी वाहतूक पोलिसांचा पूर्णपणे अभाव जाणवत असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने शिस्त बिघडली आहे.
नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी जोर धरू लागली असून, वन डे-वन साईड योजनेची पुन्हा कडक अंमलबजावणी करावी, बेकायदेशीर पार्किंगवर दंडात्मक कारवाई करावी, फेरीवाल्यांसाठी स्वतंत्र जागा निश्चित करावी आणि बाजारपेठेतील वाहतूक व्यवस्थापनासाठी ठोस आराखडा तयार करावा, अशी नागरिकातून बोलले जात आहे.

# गोवंश तस्करी व चोरी प्रकरणी कठोर कारवाई करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ एप्रिल**
ग्रामीण भागासह शहरात गोवंश तस्करी व चोरीच्या घटना घडत आहेत परंतु पोलिस प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप हिंदुत्ववादी संघटनेने केला असून गोवंश तस्करी व चोरी करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.
शहरातील यशवंत नगर भागात गुरूवारी रात्री ५ गोवंशांना गुंगीचे औषध व ब्रेडमध्ये चारून बेशुध्द करण्यात आले. त्यामध्ये एका गायीचा मृत्यु झाला आहे. चार गोवंश चोरट्यांनी चोरी करून नेल्याची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. ग्रामीण भागातही अशाच प्रकारच्या घटना घडत आहेत. वाशिम आणि जवळा बाजार येथे रविवारी गुरांचा बाजार असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी गोवंश विक्रीसाठी तसेच रविवारी अनेक ठिकाणी गोवंशाची कत्तल केली जात आहे. हिंगोली शहरातील पेन्शनपुरा भागात गोवंश गाडीसहीत गोदामात आणली जातात अनेक मुक्या प्राण्यांचे जीव जात आहेत. गोवंश तस्करी व चोरी करणाऱ्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी प्रकाशचंद सोनी, राजेंद्र हलवाई, विजय शिंदे, कैलास श्रीनाथ, कृष्णा जगताप, विशाल यादव, चंद्रशेखर लाडणे यांनी आदींनी केली आहे.

# वसमत शहरात घाणीचे साम्राज्य, घंटागाड्या गायब, जनतेला सोडले रामभरोसे

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ९ एप्रिल**
वसमत शहर अक्षरशः घाणीच्या विळख्यात सापडले आहे. मुख्य रस्ते, बाजारपेठा, शाळा परिसर तसेच विविध वसाहतींमध्ये कचऱ्याचे ढिग साचलेले असून, नागरिकांचे दैनंदिन जीवन असह्य झाले आहे. नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचे या गंभीर प्रश्नाकडे संपूर्ण दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संतप्त नागरिकांकडून केला जात आहे.
निवडणुकीच्या काळात स्वच्छ, सुंदर वसमतचे स्वप्न दाखवत मोठमोठी आश्वासने देण्यात आली होती. मात्र निवडणुका पार पडताच ही आश्वासने केवळ कागदावरच राहिली असून, प्रत्यक्षात शहराची अवस्था अधिकच बिकट झाल्याचे दिसून येत आहे. निवडणुकीपूर्वी आश्वासनांचा पाऊस आणि निवडणुकीनंतर पूर्ण कोरडेपणा अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. आपला वसमत आता पूर्णपणे नशिबावर सोडण्यात आला आहे का? असा संतप्त सवाल सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.
शहरात कचरा उचलण्यासाठी असलेल्या घंटागाड्या अनेक भागांतून पूर्णपणे गायब झाल्या आहेत. काही ठिकाणी आठवडाभर कचरा उचलला जात नसल्याने कचऱ्याचे ढिग रस्त्यावरच कुजत पडले आहेत. परिणामी दुर्गंधीने नागरिकांचे जगणे कठीण झाले असून, डास, माश्या व भटक्या जनावरांचा त्रास प्रचंड वाढला आहे. या सर्व प्रकारामुळे डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढत चालला आहे.
विवेकवर्धिनी शाळा परिसर, राम मंदिर परिसर, बागल हॉस्पिटल परिसर, तसेच इतर भागांमध्येही स्वच्छतेचा पूर्ण बोजवारा उडालेला दिसतो. शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक व रुग्णांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून स्वच्छतेबाबत मोठे दावे केले जात असले तरी प्रत्यक्षात कुठेही ठोस नियोजन किंवा अंमलबजावणी दिसत नाही. शहरातील कचरा व्यवस्थापन, घंटागाडी व्यवस्था, सफाई कर्मचाऱ्यांची उपस्थिती याबाबत कोणतीही पारदर्शकता नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. सोशल मीडियावर व फोनद्वारे वारंवार तक्रारी करूनही अधिकारी व पदाधिकारी केवळ आश्वासने देत वेळ मारून नेत असल्याचा आरोपही केला जात आहे. शहरातील स्वच्छतेचा प्रश्न तात्काळ मार्गी लावून नियमित कचरा उचल, घंटागाड्या पुन्हा सुरू करणे, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# डॉ. होमी भाभा राज्यस्तरीय स्पर्धेत सांदीपनी पब्लीक स्कूलचे घवघवीत यश




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ एप्रिल**
मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक राज्यस्तरीय स्पर्धेत सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थी आरवकुमार संजय सुंदाळे यांनी सिमेंटचे रस्ते व त्यांचा पर्यावरणावर होणारा परिणाम या विषयावर संशोधन सादर करून तृतीय क्रमांकाचे कांस्य पदक मिळवले. ही स्पर्धा तीन टप्प्यांत घेण्यात आली होतीप्रश्नोत्तर फेरी, प्रात्यक्षिक सादरीकरण आणि प्रकल्प सादरीकरण व मुलाखत. सर्व टप्प्यांत आरवकुमार संजय सुंदाळे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत नवीन संशोधन सादर केले आणि विज्ञान क्षेत्रात आपली बाजी मारली. शाळेचे विज्ञान शिक्षक कालेश्वर पावडे यांचे या विद्यार्थ्याला सखोल मार्गदर्शन लाभले. शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका हरप्रीत कौर, शैक्षणिक समन्वय सल्लागार केदार शर्मा आणि प्रशासक मारुती मेकाले सर आदींनी विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्याला स्मृतीचिन्ह प्रदान केले. सांदीपनी पब्लिक स्कूलने विज्ञान क्षेत्रात राज्यस्तरीय स्पर्धेत मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि शाळेच्या शैक्षणिक प्रयत्नांचे फलित आहे. हे यश शाळेच्या गौरवात भर घालणारे ठरले आहे.

# ४ लाख ९७ हजारांचा गुटखा जप्त



**हिंगोली, ९ एप्रिल–** शहरातील पेन्शनपुरा भागात एका इसमाने किरायाचे घरात शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा साठवून ठेवल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाल्यानंतर पथकाने दि ९ एप्रिल रोजी छापा टाकून घटनास्थळावरून ४ लाख ९७ हजार ७२ रूपयांचा गुटखा जप्त केला आहे. दोघांना अटक करण्यात आली आहे. सदरील कारवाई पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपअधीक्षक मयूर रसाळ, पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि माधव जिव्हारे, किशोर सावंत, आजम प्यारेवाले, विशाल खंडागळे, प्रशांत वाघमारे यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# प्रत्येक घटकांनी डॉ. आंबेडकर यांचे विचार अंगीकृत करावे -कुलगुरु डॉ. चासकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ एप्रिल -**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र तसेच प्राध्यापक, अधिकारी व विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सप्ताहाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रस्तुत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी सांगितले की समाजातील प्रत्येक घटकांनी फुले, शाहू ,आंबेडकर यांचे विचार अंगीकृत केल्यास खऱ्याअर्थाने त्यांना अभिवादन केल्यासारखे होईल.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन अभ्यास केंद्र, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त सामाजिक समता सप्ताहाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मंचावर प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, प्रमुख वक्ते व चळवळीचे अभ्यासक डॉ. नारायण कांबळे, डॉ. रवी एन. सरोदे, डॉ. राजपालसिंह चिखलीकर, डॉ. मारोती गायकवाड, डॉ. राजेंद्र गोणारकर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनीता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने प्रमुख वक्ते डॉ. नारायण कांबळे यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केवळ एका समाजा पुरते मर्यादित न ठेवता देशातील प्रत्येक घटकांनी त्यांचे विचार आचरणात आणले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्र उभारणीसाठी केलेले व्यापक कार्य आजही दुर्लक्ष केले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ समाजनेते नसून ते समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि इतिहासकार होते. हे देखील येथील अभ्यासकांनी विसरता कामा नये. त्यांच्या विचारांचा



विद्यापीठीय अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी आजही संघर्ष करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनीता पाटील यांनी केले. सूत्रसंचालन शिल्पा उदगीरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सिद्धार्थ शेळके यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. हर्षवर्धन दवणे, स्वप्निल नरबाग, मनोहर सोनकांबळे, संदीप एडके, काळबा हनवते, सिद्धार्थ वाघमारे, श्रद्धा हेरकर, प्रज्ञा अटकोरे, राजरत्न पवार आदींनी परिश्रम घेतले.

## विविध वृत्त...

### राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मुखेड तालुका अध्यक्षपदी स्वप्नील चव्हाण



**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. ९ एप्रिल -**
राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाच्या मुखेड तालुका अध्यक्षपदी माजी समाज कल्याण सभापती तथा युवा नेते स्वप्नील चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार ) पक्षाच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या आदेशानुसार व आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या सुचनेनुसार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांनी माजी समाज कल्याण सभापती स्वप्नील चव्हाण यांची मुखेड तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे नियुक्तीपत्र दिले. यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, जिल्हा अध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, माजी आ. अविनाश घाटे, व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांच्या उपस्थितित नियुक्तीपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. या निवडीचे तालुक्यात फटाके वाजवत पेढे वाटून स्वागत करण्यात येत आहे. स्वप्निल चव्हाण यांनी गतवर्षी दि. ११ मे २०२५ रोजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांची चव्हाणवाडी ता. मुखेड येथे मोठी जाहीर सभा घेतली होती. उपमुख्यमंत्री स्व अजित दादा पवार यांच्या भाषणाची ऊर्जा कायम ठेवत स्वप्नील चव्हाण यांनी तालुक्यात मोठ्या प्रमाणात पक्ष संघटन केले. त्यांनी करत असलेल्या कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांची तालुकाध्यक्षपदी वर्णी लावली आहे. यावेळी स्वप्नील चव्हाण म्हणाले की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सर्वांना सोबत घेऊन पक्षाला सत्तेत बसवून सर्व सामान्य जनतेला न्याय देत सर्वांगीन विकास करून स्व. अजित दादांना अभिप्रेत असलेले कार्य पक्षश्रेठीच्या मार्गदर्शनाखाली करणार असल्याचे सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल त्यांनी पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांचे आभार मानले. या निवडीचे तालुक्यातून स्वागत होत आहे.

### एमपीएससी अंतर्गत 'क' गट परीक्षेत कु. शुभांगी पातेवार यांची निवड

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ९ एप्रिल** - महाराष्ट्र लोकसेवा आयोग अंतर्गत घेण्यात आलेल्या गट 'क' परीक्षेत शुभांगी बालाजी पातेवार हिने ढ्रु -गीळींरपीं पदावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे पातेवार कुटुंबासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रचंड मेहनत, जिद्द, संयम आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर शुभांगीने हे यश मिळवले आहे. स्पर्धा परीक्षांच्या कठीण प्रवासात अनेक अडचणींवर मात करत तिने आपल्या ध्येयाकडे वाटचाल कायम ठेवली आणि अखेर यशाला गवसणी घातली. तिच्या या यशाबद्दल कुटुंबीयांनी आनंद व्यक्त करत तिच्या चिकाटीचे कौतुक केले.यावेळी आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश तेललवार , माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, व्यापारी असोसियन अध्यक्ष नामदेव कटकमवार

बांधकाम समिती उपाध्यक्ष सूर्यकांत कोटगिरे, जिल्हा सदस्य नितीन कोंडावार, उद्योजक तुकाराम कोटलवार, प्रशांत पातेवार, बालाजी कोटगीरे, विजय कटकमवार, दिपक रूद्रवार, राम वट्टमवार, बंडू कटकमवार, नागेश दमकोंडवार, चंद्रकांत कोंडावार, स्वप्निल दमकोंडवार,विकास कोटगीरे यांनी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### मुदखेड शहरात भव्य शोभयात्रा व धर्मसभा संपन्न

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ९ एप्रिल** प्रभू रामचंद्रांच्या व छत्रपती शिवाजी महाराजांच्या गगनस्पर्शी जयजयकार करत मुदखेड येथे प्रभु श्री रामचंद्राचा व छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव दि.०६ एप्रिल रोजी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला,शहरातील चौमुखी गणपती जवळील श्रीराम मंदिर येथे महाआरती करण्यात आली त्यानंतर दुपारी शोभा यात्रेस प्रारंभ झाला.

शोभायात्रा मार्गावर पूर्ण वातावरण भगवे झाले,प्रत्येकाने आपापल्या घरा समोर रांगोळी काढत,पुष्पवृष्टी करुन शहरात जागोजागी शोभायात्रेचे स्वागत केले,शोभायात्रेत विविध देखावे तयार करण्यात आले होते, प्रभु श्रीरामाची भव्य मुर्ती, पालखी,छत्रपती शिवाजी महाराज यांची व छत्रपती संभाजी महाराज यांची मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती,

शोभायात्रे मध्ये श्रीराम पालखी,श्रीराम मूर्ती देखावा,महाकाल देखावा,बँड पथक,

संजीवनी भजनी मंडळ नांदेड,आकर्षक छत्री देखावा,सर्वांचे आकर्षण वेधून घेतले.

शोभायात्रा हि चौधरी गल्ली, छत्रपती संभाजी नगर,(मराठा गल्ली), कासार गल्ली, मठ गल्ली, पोलिस स्टेशन,गुजरी, मोंढा मैदान येथे शोभायात्रेच रूपांतर विराट धर्म सभेत झाले.

शोभायात्रा मर्गात माधव बल्फेवाड,श्री अपरंपार मित्र परिवार,बजरंग चंद्रे,माजी नगराध्यक्ष राम चौधरी,आर्य वैश्य समाज,अमोल आबादार मित्र परिवार यांच्या तर्फे महाप्रसाद व थंडपेय ठेवण्यात आला होता.

धर्म सभेसाठी मुख्य वक्ते म्हणून डॉ.गौतम खट्टर (हरियाणा),यांची उपस्थिती होती,त्याचबरोबर धर्मपिठावर व्यंकटेशाचार्य महाराज नांदेड,गुरू पादेश्वर शिवाचार्य महाराज,वीरमठ वसमत,सद्योजात शिवाचार्य महाराज नागठाण,ईश्वर महाराज मुदखेड,यांची प्रमुख उपस्थिती होती.

या धर्मसभेसाठी विश्व हिंदू परिषद,बजरंग दल,

हनुमान चालीसा समिती व सकल हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या धर्म सभेचे प्रास्ताविक राजु बारतोंडे यांनी केले तर सुत्रसंचालन संतोष सावंत व आभार राम आबादार यांनी मानले.

# नांदेड मधील गुन्हेगारी चे संपूर्ण उच्चाटन करा : खा. गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ एप्रिल** - नांदेड शहर व जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था प्रचंड बिघडली आहे. अवघ्या ७० तासांत पाच जणांचे खून करण्यात आले आहेत. अवैध धंदे प्रचंड फोफावले आहेत . बलात्कार, घरपोडी, लुटमार सारख्या घटनांनी नांदेडकर त्रस्त झाले आहेत. अशा परिस्थितीत नांदेड शहर व जिल्ह्यातील गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कठोर उपाययोजना करा. नांदेडकरांना सुरक्षा पुरवा, सीसीटीव्ही कॅमेरा सुसज्ज सिटी सर्विलंस यंत्रणा संपूर्ण शहरात बसविणे, नांदेड शहरातील स्नेह नगर येथील जीर्ण झालेली कर्मचारी निवासस्थाने नव्याने उभारणे,

नांदेड शहरातील पोलीस मुख्यालय येथील जीर्ण झालेल्या इमारतींचे बांधकाम करणे, वजीराबाद येथील वाहतूक गुन्हे शाखेचे कार्यालय अद्यावत करणे, तथा नांदेड जिल्ह्यातील पोलीस वसाहतीत नवीन निवासी संकुलांचे बांधकाम करणे तसेच नांदेड जिल्ह्यातील जीर्ण झालेल्या पोलीस स्टेशनच्या इमारती सुद्धा नव्याने निर्माण करणे अशा विविध मागण्या खा. डॉ. अजित गोपछडे यांनी राज्याचे पो-



लीस महासंचालक सदानंद दाते यांच्याकडे केल्या आहेत. खा. डॉ. गोपछडे यांनी आज दाते यांची पोलीस महासंचालक कार्यालयात जाऊन भेट घेतली. मागण्यांचे निवेदन सादर केले.

नांदेड शहरात दिनांक ४ एप्रिल ते ६ एप्रिल या तीन दिवसाच्या काळात तब्बल पाच हत्या झाल्या आहेत . यामुळे नांदेडकर प्रचंड भयभीत झाले आहेत. एका पाठोपाठ एक खुनाच्या घटना घडत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न प्रचंड निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत भयभीत झालेल्या नांदेडकरांना सुरक्षेचे वातावरण पुन्हा निर्माण करून देण्याची जबाबदारी पोलीस दलाची असतानाही नांदेड पोलीस मात्र बघ्याची भूमिका घेत आहेत. नांदेड जिल्ह्यात वाळू माफीयांचे स्तोम माजले आहे. अवैध गुटखा प्रत्येक गल्ली बोळात मिळतो आहे. गुटखा माफियांची दादागिरी प्रचंड वाढली आहे . वेश्याव्यवसाय जोमात सुरू आहे. रस्त्यावर वाटमारी केली जात आहे. व्यापाऱ्यांचे लाखो रुपये पळवले जात आहेत. महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून घेतली जात आहेत. या सर्व घटनांमुळे नांदेड जिल्हा अत्यंत संवेदनशील होत चालला आहे. विशेषतः गुन्हेगारी जगतात असलेल्या गँगस्टारकडून अल्पवयीन मुलांना ओढले जात आहे. त्यामुळे जिल्ह्यासह राज्याचे भविष्य धोक्यात येते आहे. ही परिस्थिती लक्षात घेता नांदेड जिल्ह्यात पुन्हा कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी , गुन्हेगारीला आळा बसावा, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन व्हावे यासाठी कठोर उपाय योजना कराव्यात अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे . दरम्यान नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारीचे मुळासकट उच्चाटन करण्यासाठी कठोर पावले उचलली जातील असा विश्वास राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी खा. डॉ. गोपछडे यांना दिला आहे.

# मुक प्राण्यांवरील क्रोर्याचा रामतीर्थ पोलिसांनी केला पर्दाफाश

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव दि. ९ एप्रिल –**
समाजात मानवतेची जपणूक करण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसून, संवेदनशील मनोवृत्तीही तितकीच आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर रामतीर्थ पोलिसांनी ७ एप्रिल रोजी रात्री उघडकीस आणलेली एक घटना समाजाला विचार करायला भाग पाडणारी ठरली आहे.

लोहगाव रोडवरील सरकारी दवाखान्यासमोर रात्री सुमारे ८:१० वाजण्याच्या सुमारास एका महिंद्रा पिकअप वाहनातून गोवंश जातीचे प्राणी अत्यंत निर्दयपणे वाहतूक केली जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. तत्काळ कारवाई करत पोलिसांनी वाहन अडवून तपास केला असता, प्राण्यांना अमानुष पद्धतीने कोंबून नेले जात असल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी विजय रामराव काळेकर (वय ३५, रा. चिटमोगरा) याला आरोपी म्हणून ताब्यात घेण्यात आले असून, पोलीस अंमलदार गौस्खोन अयुबखा पठाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक ५६/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० अंतर्गत विविध कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईदरम्यान सुमारे ९ लाख रुपये किमतीचे पांढऱ्या रंगाचे महिंद्रा पिकअप वाहन आणि त्यातील गोवंश जप्त करण्यात आले आहेत. पुढील तपास पोलीस हवालदार काळे



करत आहेत.

ही घटना केवळ कायद्याचे उल्लंघन नसून, मानवतेलाच काळिमा फासणारी आहे. प्राणीही सजीव आहेत, त्यांनाही वेदना होतात याची जाणीव समाजाने ठेवणे अत्यावश्यक आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी केवळ प्रशासन नव्हे, तर प्रत्येक नागरिकाने जागरूक राहून अशा घटनांची माहिती संबंधित यंत्रणेला देणे गरजेचे आहे.

आज गरज आहे ती कठोर कायद्यांसोबत संवेदनशील समाज घडवण्याची. प्राण्यांवरील अत्याचार थांबवणे ही केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक जबाबदारीही आहे–आणि ही जबाबदारी आपण सर्वांनी स्वीकारली तरच खऱ्या अर्थाने परिवर्तन घडू शकते.

# शहीद जवानांची कुटुंबे ही नेहमीच सीआरपीएफची कुटुंबे आहेतः प्रा.गोपाळ कृष्ण राव

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ९ एप्रिल** - दि.९ एप्रिल रोजी, केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात शौर्य दिवस साजरा करण्यात आला. या दिवसाचे महत्त्व यावरून लक्षात येते की, याच दिवशी, ९ एप्रिल १९६५ रोजी, केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या दुसऱ्या बटालियनच्या एका छोट्या तुकडीने गुजरातच्या कच्छच्या रणातील सरदार पोस्टवर पाकिस्तानी ब्रिगेडने केलेला हल्ला परतवून लावला होता. या हल्ल्यात ३४ पाकिस्तानी सैनिक ठार झाले आणि चौघांना जिवंत पकडण्यात आले. लष्करी युद्धाच्या इतिहासातील ही एक अद्वितीय ऐतिहासिक घटना आहे, ज्यात सीआरपीएफच्या एका छोट्या तुकडीने पूर्णपणे सुसज्ज असलेल्या पाकिस्तानी पायदळ ब्रिगेडशी लढा दिला. या लढाईत, केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या सात शूर योद्ध्यांनी देशाच्या संरक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिले. दरवर्षी, सीआरपीएफच्या शूर सैनिकांना आदरांजली वाहण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी ९ एप्रिल हा दिवस शौर्य दिवस म्हणून साजरा केला जातो.

याप्रसंगी संस्थेचे आर. गोपाळ कृष्ण राव, आयपीएस, यांनी भाषण केले. सीटीसी, मुदखेडचे पोलीस महानिरीक्षक/प्राचार्य यांनी सकाळी साडेनऊ वाजता



शहीद स्मारकावर शहीदांना आदरांजली वाहिली, त्यानंतर क्वार्टर गार्डला सलामी देण्यात आली. एक लष्करी परिषद आयोजित करण्यात आली होती, जिथे शौर्यासाठी पोलीस पदकाने सन्मानित झालेले संस्थेचे सहायक कमांडंट, वासुदेव यांचा सत्कार करण्यात आला. याव्यतिरिक्त, संस्थेचे प्रमुख, पोलीस महानिरीक्षक/प्राचार्य, आर. गोपाळ कृष्ण राव, आयपीएस यांनी तीन शूर महिलांचा सत्कार केला आणि त्यांना आश्वासन दिले की शहीद जवानांची कुटुंबे ही नेहमीच सीआरपीएफची कुटुंबे आहेत आणि त्यांना सर्वतोपरी पाठिंबा देत राहतील. पोलीस महानिरीक्षक/प्राचार्य, आर. गोपाळ कृष्ण राव, आयपीएस यांनी शौर्य दिनानिमित्त उपस्थित सर्व अधिकारी, अधीनस्थ आणि प्रशिक्षकांना शुभेच्छा दिल्या आणि या घटनेतून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

शौर्य दिनानिमित्त संस्थेतील सर्व सैनिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, बास्केटबॉल आणि रस्सीखेच स्पर्धा तसेच एका भव्य स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी संस्थेचे इतर अधिकारी व्ही. पी. त्रिपाठी, कमांडंट/सीटीओ,अरुण कुमार, डेप्युटी कमांडंट, मोहम्मद शहेनवाज, डेप्युटी कमांडंट, वासुदेवन (पीएमजी), असिस्टंट कमांडंट, हरिशंकर प्रसाद, असिस्टंट कमांडंट, उत्तम साखरे, असिस्टंट कमांडंट (मंत्री), ए. एस. आर. के. चंदर, असिस्टंट कमांडंट (पीएस) तसेच इतर अधीनस्थ अधिकारी आणि प्रशिक्षक उपस्थित होते.

## डॉ. चंद्रजित जाधव यांचे पारडी येथे स्वागत

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ९ एप्रिल** - महाराष्ट्र राज्य खो.खो.असोसिएयन राज्य संघटनेचे सचिव डॉ इंद्रजित जाधव यांचे परडी यैथे स्वागत करतात आले. डॉ. चंद्रजित जाधव यांनी पारडी जि.प.शाळेतील खेळाडूंच्या कार्यक्रमाला उपस्थित राहुन मार्गदर्शन केले.यावेळी राष्ट्रीय खेळाडू डॉ चंद्रजित जाधव ,अध्यक्षस्थानी गोविंद नांदेडे, निशिकांत देशमुख माजी मुख्याध्यापक तेरणा हायस्कूल धाराशिव, रितेश जाधव राष्ट्रीय खेळाडू, महेंद्र कुमार गाढवे सचिव सातारा जिल्हा खोखो असोसिएशन, बालाजी शिर्शिकर जिल्हा क्रिडा अधिकारी,प्रा. डॉ रमेश नांदेडकर सचिव जिल्हा खो खो असोसिएशन आदी मान्यवरांची उपस्थिती होती.जि.प.प्रा. शाळा, ग्रामपंचायत पारडी व समस्त ग्रामस्थांच्या वतीने शाल पुष्पहार घालून व बळीराम पवार,सौ.ज्योती बळीराम पवार कुटुंबियांनी खारिक खोबर्याचा हार घालून भव्य सत्कार केला. यावेळी पुढे बोलतांना डॉ. चंद्रजित जाधव म्हणाले की,विद्यार्थ्यांनी स्वतः च्या जिवनात बदल घडवायचा असेल तर नेहमीच चांगले बोलणे, चांगले वागणे, अक्षर सुंदर असले पाहिजे.प्रत्येक गोष्टींची सुंदरता विद्यार्थ्यांनी वाढवायचा प्रयत्न करावा.आई वडील गुरू जनांना विसरू नका.मोबाईल चा चांगल्या गोष्टींसाठी वापर करावा. खेळाडूंतील गुण पाहता सर्वोत्तम खेळाडू पारडी येथील जि.प.शाळेत असल्याचे प्रतिपादन डॉ. चंद्रजित जाधव यांनी केले.

# जिभेच्या कॅन्सर वर यशोदा हॉस्पिटल येथे यशस्वी उपचार : सर्जन सीएन श्रीकांत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ एप्रिल -**
वसमत येथील रुग्ण रावसाहेब आंबोरे यांना वर्षांपूर्वी जिभेला अल्सर सारखी लक्षणे दिसत होती. बायोप्सी केली असता त्यामध्ये कर्करोगाचे निदान झाले. अंभोरे यांनी कुठेही न घाबरता यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथील जनसंपर्क अधिकारी किरण बंडे यांच्याशी संपर्क साधून सविस्तर माहिती घेऊन सिकंदराबाद येथील तज्ञ डॉक्टर सी एन श्रीकांत यांच्या देखरेकीखाली यशस्वी शस्त्रक्रिया संपन्न झाली. शस्त्रक्रियेमध्ये कर्करोग ग्रस्त भाग काढून टाकण्यात आला. आणि आजही ते निरोगी आयुष्य जगत आहेत प्रत्येक महिन्याला सरांशी येऊन संपर्कामध्ये आहेत.

जिभेच्या कॅन्सरवर उपचार मुख्यत्वे शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करत पहिल्या टप्प्यातील कॅन्सर रुग्णावर जीभ वाचवण्यासह जीवदान देण्यात यश




मिळविले आहे कॅन्सर आजारावर अत्याधुनिक पद्धतीने यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथे उपचार केले जातात अलीकडच्या काळातील जागतिक स्तरावरील प्रगत व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यशोदा मध्ये कॅन्सर थेरपी साठी करण्यात येतो यामध्ये विविध प्रकारचे तंत्रज्ञान जे आजाराच्या टप्प्यावर अवलंबून असतात. सुरुवातीच्या टप्प्यात शस्त्रक्रियेद्वारे गाठ काढून टाकणे अत्यंत प्रभावी आहे. प्रगत अवस्थेत शस्त्रक्रिया, रेडिएशन आणि केमोथेरपी यांचे मिश्रण वापरले जाते.

**जिभेच्या कॅन्सरसाठी प्रमुख उपचार पद्धती**

शस्त्रक्रिया करून सर्वात सामान्य उपचार. यात ट्युमर (गाठ) आणि आजूबाजूच्या निरोगी ऊतींचा काही भाग काढून टाकला जातो (पार्शियल किंवा टोटल ग्लोसेक्टोमी). आवश्यक असल्यास, मानेतील लिम्फ नोड्स देखील काढून टाकले जातात.

रेडिओथेरपी म्हणजे उच्च-ऊर्जा किरणे वापरून कर्करोग पेशी नष्ट केल्या जातात. हे शस्त्रक्रियेपूर्वी (ट्युमर लहान करण्यासाठी) किंवा शस्त्रक्रियेनंतर (उर्वरित पेशी मारण्यासाठी) दिले जाऊन पुढे केमोथेरपी सुरू करण्यात येते ते कर्करोग पेशी मारण्यासाठी औषधे वापरली जातात, जी प्रगत टप्प्यात प्रभावी ठरतात.

जिभेवर बरे न होणारे अल्सर, गाठ किंवा वेदना असल्यास त्वरित कर्करोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा असे आवाहन यावेळी सीनियर ऑन्कॉलॉजिस्ट तथा कॅन्सर सर्जन डॉक्टर सी एन श्रीकांत यांनी केले

**जिभेचा कर्करोग कसा शोधायचा?**

कर्करोगाची चिन्हे तपासण्यासाठी डॉक्टर प्रथम शारीरिक तपासणी करतो, त्यानंतर जीभेच्या कर्करोगाच्या निदानाची पुष्टी करण्यासाठी विविध प्रयोगशाळा तपासण्या केल्या जातात. काही चाचण्यांमध्ये एक्स-रे, सीटी, एमआरआय, जीभ बायोप्सी, एचपीव्ही चाचणी, जीभ स्क्रॅप बायोप्सी, एंडोस्कोपी, बेरियम स्वॅलो आणि पीईटी-सीटी स्कॅन यांचा समावेश होतो. त्या सर्वांना निदानासाठी आवश्यक नाही.

**जिभेच्या कर्करोगावरील उपचार..!**

जिभेच्या कर्करोगावरील मुख्य उपचार म्हणजे शस्त्रक्रिया, रेडिओथेरपी आणि केमोथेरपी. उपचार जिभेच्या कोणत्या भागाला बाधा झाली आहे, कर्करोगाचा आकार आणि तो पसरला आहे की नाही (टप्पा) यावर अवलंबून असतात.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यमंत्री ना. सौ मेघना बोर्डीकर दुर्लक्षीतांसह वंचित घटकांच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील असणारे मराठवाड्यातील उदयोन्मुख नेतृत्व.

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,प्रतिनिधी-** मराठवाड्यातील ग्रामीण भागाच्या विकास चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन, विकासाभिमुख कार्यक्रमास गती देणारे लढाऊ नेतृत्व म्हणून राज्यमंत्री आदरणीय नामदार सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्याकडे पाहीले जाते, परभणी जिल्ह्याच्या राजकीय व सामाजिक विकास चळवळीतील बाणेदार नेतृत्व, माननीय दिदींचे वडील तथा माजी आमदार आदरणीय श्री रामप्रसादजी बोर्डीकर साहेबांचा राजकारणातील प्रगाढ व दांडगा अनुभव आदरणीय दिदींच्या पाठीशी खंबीरपणे उभा ठाकलेला आहे, आपल्या वडीलांच्या अनुभवातून व मार्गदर्शनातून परभणी जिल्ह्यासह मराठवाड्याच्या विकास चळवळीस गती देण्यासाठी त्या नेहमीच प्रयत्नशील असतात, सामाजिक न्यायासाठी व विकासासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या व मराठवाड्यातील उदयोन्मुख नेतृत्व म्हणून नावारूपास आलेल्या आदरणीय दिदींचा आज वाढदिवस.

राज्यमंत्री नामदार सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांची राजकीय वाटचाल ही परभणी जिल्हा परिषदेच्या सदस्य पदापासून झाली, ग्रामीण भागातील विकास चळवळीत काम करण्याची आवड, आक्रमक व झुंजार कार्यपद्धतीच्या जोरावर आज सबंध राज्यभरातील विकास चळवळीत काम करण्याची संधी आदरणीय दिदींना लाभलेली आहे, लोकशाहीवर प्रचंड विश्वास व प्रगाढ श्रद्धा असलेल्या व प्रशासनावर मजबूत पकड असलेल्या आदरणीय दिदी आज मराठवाड्यासह संपुर्ण राज्यभरातील कामकाजात त्यांची एक वेगळी ओळख व छाप निर्माण करण्यात त्या यशस्वी होतांना दिसत आहेत.

परभणी जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील या लोकाभिमुख नेतृत्वाने मराठवाड्याच्या राजकीय पटलावर आपला आदरयुक्त दबदबा निर्माण केलेला आहे व त्याचबरोबर संबंध राज्यभरातील विकास चळवळ सशक्त करण्यासाठीचे त्यांचे प्रयत्न दिसून येत आहेत, परभणी जिल्ह्यासह मराठवाड्याच्या ग्रामीण व शहरी भागांच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी त्या प्रचंड मेहनत व अथक परिश्रम घेत असल्याचे आज आपल्या सर्वांनाच जाणवत आहे व हेच त्यांच्या कृतीतून मराठवाड्यासह सबंध राज्याच्या निदर्शनास येत आहे.



प्रगल्भ व सकारात्मक विचारधारेवर सतत कार्यरत राहून, प्रत्यक्ष कृतीतून ग्रामीण विकास चळवळ पुढे नेत असतांना, आपले कार्यकर्ते व सहकारी देखील मागे राहणार नाहीत, याची काळजी व खबरदारी आदरणीय दिदी घेतांना दिसतात, परभणी जिल्ह्यातील नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी पक्षाला मिळवून दिलेल्या यशातून हे आपल्या सर्वांनाच जाणवलेले आहे, आणि म्हणूनच या जिल्ह्यातील वंचित व दुर्लक्षीत घटकांच्या सामाजिक न्यायासाठी व उन्नतीसाठी सतत प्रयत्नशील असणारे लोकाभिमुख व कर्तुत्ववान नेतृत्व म्हणून आदरणीय दिदींकडे आम्ही मोठ्या अपेक्षेने पाहतो. ग्रामीण भागातील दुर्लक्षीत व वंचित घटकांस न्याय मिळाला पाहीजे, अंत्योदयापर्यंत अर्थात शेवटच्या घटकाचा विकास झाला पाहीजे, शेवटच्या घटकाचा उदय झाला पाहिजे, ही भावना मनात ठेवून सर्वसामान्यांसाठी काम करणारे नेतृत्व म्हणून आदरणीय दिदींकडे आम्ही पाहतो, आणि म्हणूनच परभणी जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत आदरणीय दिदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून, परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जनतेने इतिहासात प्रथमच भारतीय जनता पक्षाला सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आणले, परभणी जिल्हा परिषद अध्यक्ष पद निवडीच्या कार्यक्रमात देखील आदरणीय दिदींनी दुर्लक्षीत घटकांस न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला, सर्वसामान्य व गरीब कुटुंबातील सौ लताताई विजयकुमार वाकळे यांची परभणी जिल्हा परिष व गरीब कुटुंबातील सौ लताताई विजयकुमार वाकळे यांची परभणी जिल्हा परिषद अध्यक्ष पदावर वर्णी लावली, हे देखील आपण सर्वांनीच पाहीलेले आहे.

मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील दुर्लक्षीत घटकांस न्याय मिळाला पाहिजे, ग्रामीण भागातील मुलभूत व पायाभूत विकास चळवळीस गती मिळाली पाहिजे, परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील विकासाचा अनुशेष भरून निघाला पाहीजे, दुर्लक्षीतांच्या व वंचितांच्या सामाजिक न्यायाच्या चळवळीस चालणा मिळाली पाहीजे, आपल्या भागासह मराठवाड्यात मुलभूत व पायाभूत सुविधा विकास चळवळ प्रभावीपणे राबवली गेली पाहिजे, ग्रामीण भागातील जनमानसांचे राहणीमान उंचावले गेले पाहीजे, अशा प्रकारची प्रांजळ व निर्मळ भावना आपल्या मनात जोपासणाऱ्या व प्रत्यक्ष कृतीतून दुर्लक्षीत बुद्धीवंतास राजाश्रय देणाऱ्या या लोकाभिमुख व कर्तुत्ववान नेतृत्वाचा आज वाढदिवस, यापुढील काळातही आपणास आणखीन यश, किर्ती व नावलौकिक प्राप्त व्हावा या प्रार्थनेसह आदरणीय दिदींना वाढदिवसाच्या मनापासून खूप खूप शुभेच्छा...-विश्वनाथ प्रभाकरराव राऊत,













